CMYK
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर मंगळवार, २८ एप्रिल २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १५० । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, २८ एप्रिल २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदू समाजात अनुशासन नाही हे म्हणणे चुकीचे आहे. भीतिपोटी केलेले नियम-पालन म्हणजे अनुशासन नाही. स्वतःच्या प्रेरणेने नियम पाळणे हेच अनुशासन आहे. असे अनुशासन हिंदुस्थानात भरपूर आहे.

**- केशवराव गोरे**
रा. स्व. संघाचे पूर्व केंद्रीय कार्यालय प्रमुख

# मराठीच्या सक्तीवर परिवहन मंत्री ठाम

## मुद्दा तापण्याची शक्यता; आज होणार बैठक



**◆ मुंबई, २७ एप्रिल**

**महाराष्ट्रात प्रवासी वाहन चालवण्याचा व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक चालकाला 'व्यावहारिक मराठी' अवगत असणे आवश्यक आहे, यावर राज्य शासन ठाम आहे. ज्यांना मराठी येत नाही अशा अमराठी चालकांना ती शिकवण्यासाठी रिक्षा संघटनांनी सकारात्मक सहकार्य करावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. तसेच, या मुद्यावर तसेच उद्या परिवहन आयुक्तालयात राज्यातील ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.**




मंत्रालयातील आपल्या दालनात सोमवारी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, कामगार नेते शशांक राव, शिवसेनेचे संजय निरुपम, हाजी अराफत शेख तसेच विविध रिक्षा व टॅक्सी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र हे प्रगत राज्य असून रोजगारनिर्मिती हा सरकारचा प्रमुख उद्देश आहे. मात्र राज्यात व्यवसाय करताना आणि सर्वसामान्य प्रवाशांशी संवाद साधताना संबंधित चालकाला व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही किमान अपेक्षा आहे. राज्यभाषा म्हणून मराठीला सन्मान मिळावा, यासाठी अमराठी चालकांनी ती शिकणे आवश्यक आहे.

प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी आवश्यक असलेली प्राथमिक मराठी चालकांना शिकवण्यासाठी शासन विविध उपाययोजना राबवत आहे, असे त्यांनी सांगितले.

**मुजोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई**

अमराठी चालकांना मराठी शिकण्यासाठी ठराविक मुदत द्यावी, ही संघटनांची मागणी योग्य असून त्यावर सकारात्मक विचार सुरू आहे. तथापि, मराठी भाषा शिकणारच नाही, अशी मुजोरी करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. असा इशारा मंत्री सरनाईक यांनी दिला. *(तभा वृत्तसेवा)*

### सक्ती केली तर विरोध होणारच



**मंत्री छगन भुजबळ यांनी मराठी भाषेची सक्ती केली तर विरोध होणारच, असे वक्तव्य करीत अप्रत्यक्षपणे सरनाईक यांच्या भूमिकेला विरोध दर्शविला आहे.**

### मुजोरी मोडून काढा



**मराठी भाषेला विरोध करणाऱ्यांची मुजोरी मोडून काढा, असे निर्देश मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी दिले आहे. शिवतीर्थवर झालेल्या बैठकीत राज ठाकरे यांनी कार्यकर्ते,पदाधिकाऱ्यांना प्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यास सांगितले.**

# भारत-न्यूझीलंडमध्ये व्यापाराचे नवे पर्व

**शुल्कमुक्त करारावर स्वाक्षरी**

## १५ वर्षांत २० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे लक्ष्य

**◆ नवी दिल्ली, २७ एप्रिल**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सोमवारी मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी करण्यात आली. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅक्ले यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर दोन्ही देशांत व्यापाराचे नवे पर्व सुरू झाले आहे.

या कराराचा उद्देश द्विपक्षीय व्यापार दुप्पट करणे, भारतीय निर्यातदारांना न्यूझीलंडच्या बाजारपेठेत शुल्कमुक्त प्रवेश देणे आणि पुढील १५ वर्षांत २० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित करणे हा आहे. दोन्ही देशांमधील व्यापार आणि गुंतवणुकीवर परिणाम करू शकणारे इतर अडथळे कमी करणे हा देखील या कराराचा उद्देश असल्याचे गोयल यांनी सांगितले. या करारामुळे न्यूझीलंडमध्ये निर्यात करण्यात येणाऱ्या भारतीय उत्पादनाला कुठलेही शुल्क लागणार नाही. यामुळे वस्त्रोद्योग, तयार कपडे, चामड्याच्या वस्तू, पादत्राणे, रत्ने आणि दागिने, अभियांत्रिकी वस्तू आणि प्रक्रिया केलेले अन्न यांसारख्या श्रमकेंद्रित क्षेत्रांची स्पर्धात्मकता वाढेल. पर्यायाने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना फायदा होईल, असे ते म्हणाले. यापूर्वी, न्यूझीलंडमध्ये सिरॅमिक्स, कार्पेट्स आणि मोटार वाहनांचे सुटे भाग यांसारख्या भारतीय उत्पादनांवर १० टक्क्यांपर्यंत शुल्क आकारले जात होते. *(वृत्तसंस्था)*



पीयुष गोयल आणि न्यूझीलंडचे मंत्री टॉड मॅक्ले यांनी व्यापार करारावर स्वाक्षरी केली

### ३० टक्के शुल्क रद्द

**न्यूझीलंडच्या उत्पादनांवर लागणारे ३० टक्के शुल्क भारत रद्द करणार आहे. यात लाकूड, लोकर, मेंढीचे मांस आणि कच्चे चामडे यांसारख्या उत्पादनांचा समावेश आहे. उर्वरित ३५-६० टक्के शुल्क श्रेणींवरील शुल्क तीन, पाच, सात आणि दहा वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने रद्द केले जाईल. यामध्ये पेट्रोलियम तेल, माल्ट अर्क, वनस्पती तेल आणि निवडक यंत्रसामग्री यांचा समावेश आहे.**

### या उत्पादनांना सवलत

**न्यूझीलंडच्या ज्या उत्पादनांना शुल्कात सवलत मिळत आहे, त्यांमध्ये वाईन, औषधे, पॉलिमर, अ‍ॅल्युमिनियम आणि लोह व पोलाद उत्पादनांचा समावेश आहे. मनुका, मध, सफरचंद, किवीफळ आणि अल्ब्युमिन यांसारखी काही उत्पादने शुल्क कोट्याअंतर्गत येतील.**

## महत्त्वाचे

### सलगच्या घसरणीनंतर शेअर बाजारात तेजी

**मुंबई :** भारतीय शेअर बाजाराने सलग तीन दिवसांच्या घसरणीला पूर्णविराम देत सोमवारच्या सत्रात जोरदार पुनरागमन केले. अमेरिकेला इराणकडून 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' पुन्हा सुरू करण्याबाबत प्रस्ताव मिळाल्याच्या वृत्तामुळे जागतिक बाजारात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. याचा थेट परिणाम भारतीय बाजारावर दिसून आला आणि मुख्य निर्देशांकांनी सुमारे ०.५ टक्क्यांच्या वाढीसह व्यवहार पूर्ण केला. शांतता चर्चेतील अडथळे आणि पुरवठा साखळीतील संभाव्य धोके कमी झाल्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला. बाजार उघडताच निर्देशांकांनी चांगली सुरुवात केली. व्यवहारादरम्यान खरेदीचा ओघ वाढत गेला आणि दिवसभराच्या उच्चांकी पातळीवर बाजार स्थिरावला. व्यवहाराच्या अखेरीस सेन्सेक्स ६३९.४२ अंकांनी (०.८३ टक्के) वधारून ७७,३०३.६३ वर पोहोचला, तर निफ्टी १९४.७५ अंकांनी (०.८१ टक्के) वाढून २४,०९२.७० वर बंद झाला.

# अमरावती, वर्धेत पेटली भट्टी; उष्णतेची लाट कायम



**सोलापूरचे तापमान @ ४३.९ से.**

**◆ नागपूर, २७ एप्रिल**

मागील काही दिवसांपासून विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रात आणि देशातही उष्णतेत अव्वल ठरत आलेल्या अकोल्यातील तापमानात सोमवारी काही प्रमाणात घट पाहायला मिळाली. तिथेच आतापर्यंत दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर राहात असलेले अमरावती व वर्धा शहर राज्यात पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर आले.

रविवारी ४६.९ असे विक्रमी तापमान असलेल्या अकोला शहरात सोमवारी ४६.३ अंश तापमान नोंदविण्यात आले. तिथेच अमरावती शहरात ४६.६ आणि वर्धेत ४६.५ अंश तापमानाची नोंद झाली. त्याखालोखाल यवतमाळात ४५.२ तापमान होते. चंद्रपुरातही ४५.२ इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

नागपूर शहरात ४५ अंश तापमानाची नोंद करण्यात आली. वाशिम शहरात ४४.४ आणि बुलढाण्यात ४३.६ अंश तापमान होते. त्याखालोखाल गडचिरोली शहरात ४३.२ आणि भंडारा येथे ४२ अंश तापमान नोंदविण्यात आले. गोंदियात सर्वात कमी म्हणजे ४१ अंश तापमानाची नोंद झाली.

सोमवारी सोलापूरचे तापमान ४३.९ से. इतके होते. दरम्यान, सोमवारपासून राज्याच्या विविध भागां ध्ये विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. विदर्भासाठीही हा इशारा होता. मात्र, आज विदर्भात कुठेही अवकाळी पाऊस झाल्याची नोंद नाही. शेतकऱ्यांनी अवकाळीची शक्यता लक्षात घेत, आवश्यक ते खबरदारीचे उपाय केले होते.

# बंगालमध्ये प्रचार तोफा थंडावल्या

**◆ कोलकाता, २७ एप्रिल**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांनंतर दुसऱ्या टप्प्याचा प्रचार सोमवारी सायंकाळी थांबला. या टप्प्यात २९ एप्रिलला १४२ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात ज्या विधानसभा क्षेत्रांमध्ये मतदान होणार आहे त्यात कोलकाता उत्तर, कोलकाता दक्षिण, हावडा, नदिया, उत्तर २४ परगणा, दक्षिण २४ परगणा, हुगळी आणि पूर्व बर्धमान या आठ जिल्ह्यांचा समावेश आहे.

प्रचाराच्या शेवटच्या दिवशी बंगालमध्ये सर्व प्रमुख पक्षांनी रॅली आणि सभेच्या माध्यमातून जोरदार शक्तिप्रदर्शन केले. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभेला संबोधित केले तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रोड शोच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. *(वृत्तसंस्था)*

### बारावीचा निकाल लवकरच होणार जाहीर

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीचा निकाल लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना तो अधिकृत संकेतस्थळावर तसेच डिजिटल माध्यमांवर पाहता येणार आहे. विद्यार्थ्यांनी आपला क्रमांक आणि आवश्यक माहिती तयार ठेवणे गरजेचे आहे. निकाल पाहण्यासाठी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आवश्यक माहिती भरल्यानंतर गुणपत्रिका पाहता आणि डाउनलोड करता येईल. डिजिटल लॉकरसारख्या सुविधांमधूनही निकाल सहज उपलब्ध होणार आहे. निकालात विद्यार्थ्यांचे विषयानुसार गुण, एकूण टक्केवारी आणि उत्तीर्ण झाल्याची स्थिती यासारखी माहिती मिळणार आहे. निकाल जाहीर होताच अधिकृत संकेतस्थळावर गर्दी होण्याची शक्यता असून, विद्यार्थ्यांनी संयम ठेवून निकाल तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नाकाबंदी हटल्याशिवाय चर्चा नाही

## इराणने पाठविला अमेरिकेला प्रस्ताव, अण्वस्त्रावर वाटाघाटी करण्यास तयार

**◆ तेहरान, २७ एप्रिल**

मध्यपूर्वेतील सध्याचा तणाव आणि रखडलेल्या शांतता चर्चेच्या पृष्ठभूमीवर इराणने अमेरिकेला एक नवीन शांतता प्रस्ताव पाठविला आहे. पाकिस्तानी मध्यस्थांमार्फत सादर केलेल्या प्रस्तावात, होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकाबंदी हटविण्याची अट ठेवली आहे. अण्वस्त्र मुद्यावर वाटाघाटी करण्याची तयारी त्यांनी नवीन प्रस्तावातून दर्शविली आहे.

इराणच्या प्रस्तावित दोन टप्प्यांच्या योजनेत, होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यावर आणि नंतर अमेरिकेने घातलेली नाकाबंदी उठवण्याची मागणी करण्यात आली. दोन मागण्या मान्य झाल्यावरच कायमस्वरूपी शांतता करारावर चर्चा होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हा प्रस्ताव पाकिस्तान आणि ओमानमार्फत अमेरिकेपर्यंत पाठविण्यात आला आहे. अमेरिकेने दोन अटी मान्य केल्यास अणुकार्यक्रमावर औपचारिक वाटाघाटी सुरू होतील, असेही त्यात नमूद आहे. दुसरीकडे अमेरिकेने इराणवर कठोर अटी लादल्या आहेत, त्यात किमान १० वर्षांसाठी युरेनियम संवर्धन थांबविणे, देशातून सध्याचे आण्विक साहित्य बाहेर पाठविणे आणि प्रादेशिक गटांना व त्याच्या क्षेपणास्त्र कार्यक्रमाला दिलेला पाठिंबा संपविणे यांचा समावेश आहे.



अराघची यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने पुतिन यांची भेट घेतली

**इराणवर दबावाचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत**

अमेरिका इराणला घाबरविण्याचा प्रयत्न करीत आहे, परंतु ही युक्ती इराणसमोर चालणार नाही. इराणसंदर्भातील भूमिकेत बदल केल्यानंतरच शांतता चर्चा शक्य होऊ शकते, असा इशारा अराघची यांनी दिला आहे. *(वृत्तसंस्था)*

# बांगलादेशात हिंदू पुजाऱ्याची निर्घृण हत्या

**◆ ढाका, २७ एप्रिल**

बांगलादेशमध्ये घरातून बेपत्ता झाल्यानंतर तीन दिवसांनी एका हिंदू पुजाऱ्याचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला. प्राथमिक तपासात त्याची हत्या करून मृतदेह झाडावर लटकवण्यात आल्याचे उघड झाले. यानंतर अल्पसंख्याक संघटनेने आरोपीला शोधून कठोर कारवाईची मागणी केली आहे.

बांगलादेशच्या आग्नेय भागात एका मंदिराच्या रखवालदाराचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला. ही व्यक्ती तीन दिवसांपूर्वी बेपत्ता झाली होती. नयन साधू (वय, ४०) असे त्यांचे नाव आहे. ते चट्टोग्राम जिल्ह्यातील सातानिया उपविभागातील दोहाजारी भागाचे रहिवासी होते. कॉक्स बाजार सदर उपविभागातील खुरुशकुल



युनियनमधील शिवकाली मंदिरात रखवालदार आणि पुजारी म्हणून ते कार्यरत होते अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. बांगलादेश हिंदू बौद्ध ख्रिश्चन ऐक्य परिषदेने या घटनेचा निषेध केला आणि आरोपीला अटक करून कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. नयन बेपत्ता झाल्यानंतर तीन दिवसांनी त्याचा मृतदेह सापडला आहे. *(वृत्तसंस्था)*

### पिंपरी चिंचवडमध्ये पाद्रीचा भंडाफोड

**◆ पिंपरी, २७ एप्रिल**

पिंपरी-चिंचवड काळेवाडी येथील एका चर्चमध्ये विनापरवाना लोकांना जमवून, प्रार्थनेद्वारे असाध्य आजार बरे करण्याचा दावा करत अंधश्रद्धा पसरवणाऱ्या पाद्रीवर काळेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी तक्रारकर्त्याला मारहाण केल्याप्रकरणी पाद्रीसह इतर ७ ते ८ अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. काळेवाडीतील परमवीर कॉलनी येथील जीजस इस लॉर्ड चर्चमध्ये रविवारी सकाळी ११.३० ते दुपारी २.३० च्या दरम्यान ही घटना घडली. पाद्री केनेथ सिल्वे हा कोणत्याही परवानगीशिवाय लोकांना जमा करून त्यांची प्रार्थना घेत होता. यावेळी तो प्रार्थनेद्वारे लोकांचे गंभीर आजार बरे करतो, असा दावा करून समाजात अंधश्रद्धा पसरवत असल्याचे समोर आले. *(वृत्तसंस्था)*

# मुंबई-सोलापूर वंदेभारत रुळावरून घसरली

### सुदैवाने कोणतीही हानी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

मुंबई-सोलापूर वंदेभारत रेल्वे रुळावरुन घसरल्याची घटना पुणे स्टेशनवर सोमवार, दि.२७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही.

पुणे रेल्वे स्टेशनच्या डायमंड क्रॉसिंगवर ही रेल्वेगाडी प्रवेश करत असताना ही घटना घडली. याठिकाणी यार्ड रिमॉडेलिंगचे काम सुरु आहे. दरम्यान, प्राधिकरण प्रवाशांसाठी पर्यायी रेकची व्यवस्था करत आहे.



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरुन सोलापूरकडे येणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसच्या चौथ्या डब्याची एक ट्रॉली पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर प्रवेश करताना डायमंड क्रॉसिंगवर रुळावरुन घसरली.

या घटनेने प्रवाशांमध्ये काही काळ घबराट निर्माण झाले होते. दरम्यान, वंदेभारत रेल्वेमध्ये मिळणाऱ्या फुडच्या सुविधा, आसन व्यवस्था आदींबाबत प्रवाशांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

# उद्धव ठाकरेंच्या पराभवाची 'रणनीती'

## विधान परिषद निवडणूक | राष्ट्रवादीत उमेदवारीवरून रस्सीखेच

**◆ मुंबई, २७ एप्रिल**





विधान परिषद निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर राज्यातील राजकारण तापू लागले असून, एका बाजूला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उमेदवारीवरून अंतर्गत चढाओढ सुरू असताना, दुसऱ्या बाजूला उद्धव ठाकरे यांच्याविरोधात विविध पातळ्यांवर रणनीती आखली जात असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या दोन समांतर घडामोडींमुळे राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची बनत आहेत.

महाविकास आघाडीचा चेहरा मानले जाणारे उध्दव ठाकरे यांना विधान परिषदेत रोखण्यासाठी काही 'आंतरयंत्रणा' सक्रिय झाल्याची चर्चा आहे. या पृष्ठभूमीवर ठाकरे यांच्या उमेदवारीभोवतीचे राजकारण अधिकच संवेदनशील बनले आहे.

विशेष म्हणजे, मविआकडून ठाकरे यांना एकमुखी पाठिंबा दर्शवला जात असतानाच, विरोधी बाजूकडून राजकीय रणनीती आखली जात असल्याचे संकेत मिळत आहेत. यामुळे ही निवडणूक केवळ औपचारिक न राहता प्रतिष्ठेची लढत ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, उबाठाचे माजी आमदार तथा विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हेही इच्छुक असल्याचे समजते. त्यामुळे आघाडीतील उमेदवारीचा तिढा अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### ठाकरेंच्या भूमिकेवरून मविआत संभ्रम

**उद्धव ठाकरे यांनी स्वतः निवडणूक लढवावी, असा आग्रह महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांनी धरला असून त्यांचे मन वळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र उद्धव ठाकरे लढणार नसल्यास काँग्रेस पक्ष निवडणूक लढण्यास इच्छुक असल्याचे समजते. विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी केवळ दोन दिवस शिल्लक असतानाही उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका अद्याप स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे मित्रपक्षांमधील अस्वस्थता अधिकच वाढली आहे.**

### राष्ट्रवादीत 'कोणाला संधी?



**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विधान परिषदेच्या एका जागेसाठी जोरदार लॉबिंग सुरू असून पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक याच पृष्ठभूमीवर बोलावण्यात आली. पक्षात विक्रम काकडे, सुरेश बिराजदार, झिशान सिद्दीकी आणि राजेंद्र जैन यांसारख्या इच्छुकांची नावे चर्चेत असताना, विधान परिषद आमदार अमोल मिटकरी यांनी अचानक जय पवार यांचे नाव पुढे करून चर्चेला नवा मोड दिला आहे.**

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर
मंगळवार, २८ एप्रिल २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# भविष्यातील धोक्याची घंटा...

युद्धाच्या मैदानावर अनेक डावपेच आखले जात असतात. जेव्हा पराभवाचे सावट गडद होणार असे दिसू लागते, तेव्हा काही पावले माघार घेणे ही युद्धनीतीच असते. पण अशी माघार हा पराभव नसतो. भारतातून माओवाद संपल्याचा दावा केंद्रीय गृहमंत्र्यांनी संसदेत केला, तेव्हा युद्धनीतीच्या या डावपेचांची त्यांना कल्पना नसेल असे नाही. माओवादी लढाईचा नवा मार्ग शोधून काढतील आणि त्याला तोंड देण्यासाठी नवी रणनीती आखावी लागेल, याचीही सरकारला पुरेपूर जाणीव असेल. म्हणूनच माओवाद संपल्याचे जाहीर केल्यानंतर केंद्र सरकार स्वस्थ बसलेले नाही. नवा संघर्ष सुरू करण्याची माओवाद्यांची तयारी असणार, याचे संकेत आता मिळू लागले असून त्यास तोंड देण्यासाठी तयारी करावी लागणार, हे केंद्र सरकारचे आडाखे अचूक असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. अनेक बिनीच्या मोहऱ्यांची शरणागती आणि सशस्त्र संघर्षाकरिता असलेल्या ताकदीचे खच्चीकरण यामुळे खिळखिळ्या झालेल्या माओवाद्यांनी गनिमी काव्याने चळवळ चालविण्याची तयारी केली आहे. तेलंगणातील माओवाद्यांनी प्रसिद्धी पत्रक जारी करून संघर्षाचा नवा पवित्रा जाहीर केला आहेच; पण आत्मसमर्पण करणाऱ्या नेत्यांवर आगपाखड करीत सुडाचे नवे सत्र आरंभण्याचा इशारा देऊन नव्या रक्तरंजित संघर्षाचे संकेतही दिले आहेत. माओवाद संपलेला नाही, तर तो अस्तित्वहीन झाला आहे. ही या चळवळीची तात्पुरती माघार असून अधिक सावध राहावयास हवे, असा इशारा देणाऱ्या या पत्रकातून उमटणाऱ्या भविष्याच्या हाका सावधपणे ऐकाव्या लागतील.

एकेकाळी देशातील १८० हून अधिक जिल्ह्यांमध्ये पसरलेला माओवादी चळवळीचा 'रेड कॉरिडॉर' आता केवळ काही मोजक्या भागांत मर्यादित राहिला आहे. माओवादी किंवा नक्षलवादी चळवळ सध्या तिच्या इतिहासातील सर्वांत कठीण आणि निर्णायक टप्प्यावर उभी आहे. भारत 'नक्षलवाद मुक्ती'च्या मार्गांवर दाखल झाल्याची आनंदवार्ता केंद्र सरकारने संसदेच्या अधिवेशनात देशाला दिली.छत्तीसगडमधील सुकमा आणि विजापूर यांसारख्या अत्यंत दुर्गम भागांतील अस्तित्वाच्या काही खाणाखुणा वगळता, माओवाद्यांचा इतर भागांतील सशस्त्र प्रभाव जवळपास संपुष्टात आला आहे. नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या आता शून्याच्या जवळपास पोहोचल्याचा गृह मंत्रालयाचा अहवाल आहे. 'सीपीआय (माओवादी)' या प्रतिबंधित संघटनेची केंद्रीय समिती आणि पोलिटब्युरो आता पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. मे २०२५ मध्ये नंबाला केशव राव याचा मृत्यू आणि २०२६ च्या सुरुवातीला थिप्पिरी तिरुपती याने केलेले आत्मसमर्पण यांमुळे संघटना 'नेतृत्वहीन' अवस्थेत आहे. सुरक्षा दलांनी दुर्गम भागात 'फॉरवर्ड ऑपरेटिंग बेसेस' स्थापन केल्यामुळे नक्षलवाद्यांचे भौगोलिक कवच नष्ट झाले आहे. गेल्या दोन वर्षांत ४८०० हून अधिक कडव्या माओवाद्यांनी शस्त्रे टाकून सरकारसमोर आत्मसमर्पण केले आहे. महाराष्ट्रात, विशेषतः गडचिरोली जिल्ह्यात तर ही चळवळ शेवटच्या घटका मोजत आहे. अनेक आदिवासी गावांनी नक्षलवाद्यांना प्रवेश नाकारून 'गावबंदी' जाहीर केली आहे. नक्षलग्रस्त भागांत विकासाचे वारे वाहू लागले आहेत. रस्ते, पूल आणि मोबाईल टॉवर्सच्या जाळ्यामुळे नक्षलवाद्यांची रसद आणि माहिती मिळविण्याचे मार्ग बंद झाले आहेत. गोंदिया आणि चंद्रपूर यांसारख्या जिल्ह्यांत आता केवळ माओवादाचे अवशेष दाखविणाऱ्या काही खाणाखुणा उरल्या आहेत; त्यांच्याकडे सक्रिय सशस्त्र तुकड्या नाहीत. तथापि, अजूनही या चळवळीने उभी केलेली काही आव्हाने कायम आहेत. सशस्त्र लढा कमकुवत झाल्यावर विचारधारेचा प्रसार करण्यासाठी शहरी भागातील छुप्या नेटवर्कचा वापर वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जोपर्यंत दुर्गम भागातील आदिवासींच्या जमिनीचे प्रश्न, जल-जंगल-जमीन यांवरील हक्क आणि स्थानिक असंतोष पूर्णपणे दूर होत नाही, तोपर्यंत ही विचारधारा सुप्त स्वरूपात जिवंत राहू शकते. भविष्यात ही चळवळ हिंसक संघर्षापेक्षा राजकीय किंवा सामाजिक आंदोलनाच्या छुप्या स्वरूपात टिकून राहण्याचा प्रयत्न करू शकते, हे ओळखून केंद्र सरकारने टाकलेली पावले आणि हिंसाचाराची शक्यता नजरेआड न करता नक्षलग्रस्त भागांत वाढविलेली सुरक्षा ही आश्वासक बाब ठरते.

केंद्रीय गृहमंत्र्यांनी नक्षलवाद मुक्तीसाठी आखलेली रणनीती आणि मार्च २०२६ पर्यंतचे लक्ष्य यावर संसदेत दिलेले सविस्तर स्पष्टीकरण पाहता, शरणागती पत्करलेल्या माओवाद्यांची वाढती संख्या हे या चळवळीच्या पतनाचे एक मोठे लक्षण नक्कीच आहे, परंतु सुरक्षा यंत्रणांनी 'लष्करी विजय' मिळविल्यानंतर आता वैचारिक अस्तित्व टिकविण्याचे अस्त्र या चळवळीने परजले आहे. हे खरे आहे की, मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शरणागतीमुळे चळवळीला धक्के बसले आहेत. जेव्हा पहिल्या फळीचा एखादा नेता शरणागती पत्करतो, तेव्हा खालच्या फळीचा विश्वास डळमळीत होतो. शरणागती पत्करलेले नक्षलवादी पोलिसांना त्यांच्या गुप्त तळांची, शस्त्रास्त्रांच्या साठ्यांची आणि 'लॉजिस्टिक' पुरवठ्याची अचूक माहिती देतात. यामुळे सुरक्षा दलांना मोठे यश मिळत आहे; सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सरकारच्या पुनर्वसन धोरणामुळे नक्षलग्रस्तांनाही नक्षलवादी विचारधारेपेक्षा विकासाचा मार्ग अधिक आश्वासक वाटू लागला आहे. मैदानावर सशस्त्रपणे लढताना माघार घ्यावी लागते, तेव्हा त्या चळवळीचा मार्ग बदलला जातो. छत्तीसगड आणि ओडिशाच्या सीमेवरील अबुझमाडसारखे काही भाग अजूनही अत्यंत दुर्गम आहेत. तिथे सशस्त्र तुकड्या पूर्णपणे नष्ट झालेल्या नाहीत. त्यामुळे देश नक्षलवाद मुक्त झाल्याचे सरकारने जाहीर केल्यानंतरही, माओवाद्यांचे अस्तित्व पुसले गेले, असे म्हणता येत नाही. म्हणूनच आता अधिक सावधपणे छुप्या चळवळीचा सामना करण्याचे आव्हान सरकारसमोर उभे राहणार आहे. ही केवळ तात्पुरती माघार असल्याने सद्यस्थितीत ही चळवळ काहीशी 'अप्रासंगिक' ठरली आहे, याची नोंद घ्यावयास हवी.

सशस्त्र लढाईतील संघर्षात माओवाद्यांशी सामना करणारे प्रगत तंत्रज्ञान सुरक्षा यंत्रणांकडे उपलब्ध आहे. ड्रोन, उपग्रहांमार्फत उपलब्ध होणारी माहिती आणि मोबाईल संपर्क यंत्रणांनी सज्ज असलेल्या सुरक्षा दलांच्या अत्याधुनिक तंत्रामुळे माओवाद्यांच्या जंगलातील लढायांच्या कारवाया निकामी ठरल्या आहेत. यापुढे या लढाईचे तंत्र बदलण्याचा गनिमी कावा पुढच्या संघर्षात वापरला जाईल, असे नव्या आखणीतून दिसू लागले आहे. यापुढची चळवळ कदाचित हिंसक स्वरूपात नसेल, पण राजकीय प्रतिकार म्हणून जिवंत राहू शकते. तो प्रतिकार मोडून काढावयाचा असेल, तर गडचिरोलीमध्ये राबवण्यात आलेले आत्मसमर्पण आणि पुनर्वसन मॉडेल हा प्रभावी उपाय आहे. केवळ गडचिरोली जिल्ह्यात नव्हे, तर केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी हे एक दिशादर्शक उदाहरण आहे. या मॉडेलने माओवादी चळवळीचा कणा मोडला आहे. या नीतीतून सरकारने माओवाद्यांना केवळ शस्त्रे खाली ठेवण्यास सांगितले नाही, तर त्या बदल्यात सन्मानाने जगण्याची संधी दिली. पोलिस आणि स्थानिक प्रशासनाने माओवाद्यांच्या विरोधात शस्त्र उपसण्यापेक्षा विश्वासाचे नाते निर्माण करण्यावर भर दिला. आदिवासींना जातीचे दाखले, रेशन कार्ड आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिल्यामुळे आदिवासी भागातील जनतेचा पोलिसांवरील विश्वास वाढला आणि नक्षलवाद्यांची माहिती देणारी यंत्रणा कमकुवत झाली. आत्मसमर्पण केलेल्या तरुणांना प्रशिक्षण देऊन रोजगाराशी जोडले गेले. माजी माओवाद्यांना गावाच्या कारभारात नेतृत्व करण्याची संधी दिसू लागली. हा बदल पचवून चळवळ जिवंत ठेवण्याकरिता माओवाद्यांची धडपड सुरू झाली आहे. आता यापुढचा लढा शस्त्रांचा राहिला नसून विकासाचा आहे. गडचिरोलीत सुरू असलेले लोखंडी खाणींचे प्रकल्प आणि रस्ते बांधणीची कामे यामुळे स्थानिक तरुणांना रोजगार मिळत आहे. जोपर्यंत विकास तळागाळातील माणसापर्यंत पोहोचत राहील, तोपर्यंत माओवादी चळवळ पुन्हा उभी राहणे कठीण आहे. सावध राहावयास हवे. कारण भविष्यातील धोक्याच्या घंटा वाजण्यास सुरुवात झालेली आहे.

## आंतरराष्ट्रीय

# नेपाळमध्ये महिनाभरातच जनआक्रोश

प्रा. जयसिंग यादव

नेपाळमध्ये सध्या दिसत असलेला जनआक्रोश हा केवळ विरोध नसून सरकारसाठी एक महत्त्वाचा संदेश आहे. लोकशाही व्यवस्थेत सरकार आणि जनता यांच्यातील संवाद टिकून राहणे अत्यावश्यक असते. निर्णयांचा परिणाम थेट लोकांच्या जीवनावर होतो, तेव्हा पारदर्शकता आणि संवाद यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. बालेन शाह यांच्या नेतृत्वासमोर आता खरी कसोटी आहे. निवडणुकीमध्ये मिळालेला पाठिंबा टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रभावी प्रशासनासाठी केवळ धोरणे जाहीर करणे पुरेसे नसते, तर त्यांची अंमलबजावणी करताना जनतेच्या भावना आणि गरजा समजून घेणे आवश्यक असते. या परिस्थितीमध्ये सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे. व्यापारी, नागरिक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता आणल्यास विश्वास पुन्हा निर्माण होऊ शकतो. आर्थिक सुधारणा करताना अल्पकालीन अडचणी आणि दीर्घकालीन फायदे यामध्ये संतुलन राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नेपाळमधील सध्याची परिस्थिती ही केवळ एका देशापुरती मर्यादित नाही, तर सर्व लोकशाही व्यवस्थांसाठी एक धडा आहे. बालेन शाह यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाविरोधात जनतेचा रोष रस्त्यावर दिसू लागला आहे. काठमांडूच्या रस्त्यांपासून सत्तेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या सहदरबारपर्यंत आंदोलनांची लाट उसळली असून सरकारच्या धोरणात्मक निर्णयांविरोधात विविध स्तरांवर विरोध नोंदविला जात आहे. विशेषतः विद्यार्थी संघटनांवर घालण्यात आलेल्या निर्बंधांमुळे तरुणांमध्ये असंतोष वाढला आहे.

शिक्षण संस्थांमधील संघटनात्मक स्वातंत्र्यावर गदा येत असल्याचा आरोप करीत विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. याशिवाय, भ्रष्टाचाराविरोधात कारवाईच्या नावाखाली घेतलेले काही निर्णय निवडक आणि पक्षपाती असल्याची टीका होत आहे. सरकारच्या काही धोरणांना जनविरोधी ठरवत व्यापारी आणि नागरी समाजातील घटकांनी आंदोलनात सहभाग घेतला आहे. प्रशासनाने घेतलेल्या निर्णयांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याचे सांगत विरोधकांनी सरकारवर दबाव वाढविला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, नव्या नेतृत्वासमोरची ही पहिली मोठी कसोटी आहे. सरकारकडून या आंदोलनांना उत्तर देताना आपल्या निर्णयांचे समर्थन केले जात आहे. दीर्घकालीन सुधारणा आणि शिस्त आणण्यासाठी हे पाऊल आवश्यक असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. नेपाळमधील राजकीय वातावरण अधिक तणावपूर्ण बनण्याची शक्यता आहे. सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारून परिस्थिती हाताळली नाही, तर हा जनआक्रोश तीव्र होऊ शकतो. सहा महिन्यांपूर्वीच्या युवा पिढीच्या आंदोलनातून सत्तेवर आलेल्या नेपाळमधील शाह यांच्या सरकारवर अवघ्या २६ दिवसांमध्ये नामुष्की आली. नेपाळमध्ये सध्या घडत असलेल्या राजकीय आणि आर्थिक घडामोडी या केवळ एका देशापुरत्या मर्यादित नाहीत, तर नव्या पिढीच्या नेतृत्वाची आणि त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनाची मोठी परीक्षा



ठरत आहेत. 'जेन-झी' आंदोलनातून पुढे आलेल्या बालेन शाह आणि रवी लामिछाने यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी सत्तेत आल्यानंतर बदलाची मोठी अपेक्षा निर्माण झाली होती. पारंपरिक राजकारणाला पर्याय म्हणून या नेतृत्वाकडे पाहिले गेले; मात्र सत्तेच्या वास्तवात या अपेक्षांची पूर्तता करणे किती कठीण असते, हे आता प्रकर्षाने समोर येत आहे. येथे सुदान गुरुंग यांनी गृहमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. उद्योगपती दीपक भट्टा यांच्याशी कथित संबंध आणि 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणातील वादाच्या पृष्ठभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. या घडामोडीमुळे बालेन शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारसमोर नवे राजकीय आव्हान उभे राहिले आहे.

युवकांना आंदोलनात पाठिंबा देणारे शाह धुतल्या तांदळासारखे नाहीत, हे युवकांना माहीत नसेल, तरी देशातील सुज्ञांना चांगलेच उमगले आहे. नेपाळमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर २७ मार्च रोजी शाह यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती. त्यानंतर अवघ्या एका महिन्याच्या आतच सरकारमध्ये मोठ्या उलथापालथी घडताना दिसत आहेत. यापूर्वी कामगार मंत्री कुमार शाह यांना शिस्तभंगाच्या आरोपांवरून पदावरून हटवण्यात आले होते. आता गृहमंत्र्यांचा राजीनामा ही दुसरी मोठी घटना ठरली आहे. राजीनामा देताना गुरुंग यांनी सोशल मीडियावर आपली भूमिका स्पष्ट केली. स्वतःशी संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि पदावर राहून हितसंबंधांचा संघर्ष होऊ नये, यासाठी आपण पदत्याग केल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधानांनी एकीकडे सात माजी पंतप्रधान, माजी राजा, माजी राष्ट्रपती यांच्या कथित घोटाळ्याच्या चौकशीसाठी न्यायिक समित्या स्थापन केल्या असताना दुसरीकडे आपल्याच मंत्रिमंडळात आरोप असलेल्यांना स्थान देऊन गृहमंत्रिपदासारखे मोठे पद देण्याचा प्रमाद केला. गुरुंग यांचे नाव एका मायक्रो इन्शुरन्स कंपनीतील गुंतवणुकीशी जोडले गेले आहे. या कंपनीत 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणात चौकशी सुरू असलेल्या दीपक भट्टा यांच्यासह इतर व्यावसायिकांचाही सहभाग असल्याचे सांगितले जात आहे.

ताज्या राजीनाम्यामुळे नेपाळमधील नव्या सरकारची प्रतिमा आणि स्थैर्यापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'जेन-झी' आंदोलनातून सत्तेत आलेल्या नेतृत्वाकडून पारदर्शकता आणि स्वच्छ प्रशासनाची अपेक्षा होती. त्यामुळे अशा वादग्रस्त प्रकरणांमुळे सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनातील पारदर्शकता, जबाबदारी आणि नैतिकता या मूल्यांवर सरकार किती ठाम राहते, यावर पुढील राजकीय दिशा अवलंबून राहणार आहे. नव्या सरकारने घेतलेल्या निर्णयांमध्ये सीमा शुल्क नियमांमधील बदल हा सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे. हे बदल केवळ प्रशासनिक सुधारणांच्या दृष्टीने पाहिले गेले, तरी त्यांचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर आणि जनजीवनावर झाला आहे. नेपाळची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. विशेषतः भारतासोबतचा व्यापार हा त्याचा कणा मानला जातो. अशा परिस्थितीत सीमावर्ती व्यापारावर परिणाम करणारे कोणतेही निर्णय अत्यंत संवेदनशील ठरतात. व्यापारात अनिश्चितता वाढली असून वस्तूंच्या किमतींवर याचा परिणाम होत आहे. महागाईचा दबाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. यामुळे सामान्य नागरिकांमध्येही नाराजी वाढली आहे. दीर्घकालीन आर्थिक शिस्तीसाठी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांचा अल्पकालीन परिणाम जनतेला सहन करावा लागतो, ही वस्तुस्थिती येथे पुन्हा अधोरेखित झाली आहे.

या पृष्ठभूमीवर उभा राहिलेला जनआक्रोश हा केवळ राजकीय विरोध मानणे योग्य ठरणार नाही. हा लोकशाही व्यवस्थेतील एक नैसर्गिक प्रतिसाद आहे. निर्णय प्रक्रियेत संवादाचा अभाव जाणवतो, तेव्हा लोक रस्त्यावर उतरतात. नव्या नेतृत्वाकडून अपेक्षित असलेली पारदर्शकता आणि संवाद यामध्ये काही प्रमाणात कमी पडल्याची भावना निर्माण झाली आहे. दुसरीकडे सरकारच्या दृष्टीने पाहता हे निर्णय पूर्णपणे चुकीचे आहेत, असे म्हणता येणार नाही. भ्रष्टाचाराला आळा घालणे, महसूल वाढविणे आणि प्रशासन अधिक कार्यक्षम बनविणे हे कोणत्याही सरकारचे प्राथमिक उद्दिष्ट असते; मात्र, या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी घेतलेल्या उपाययोजनांची वेळ, पद्धत आणि अंमलबजावणी यांचा विचार तितकाच महत्त्वाचा असतो.


(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# घातक विळखा फास्ट फूडचा

आजच्या आधुनिक युगामध्ये आमच्या सर्व सवयी बदलल्या. ताटामध्ये काय असावे, याचे आम्हाला साधे भानही उरले नाही. आम्ही अन्नाला पूर्णब्रह्म मानणारे असूनही त्यापासून दूर होत गेलो. खाण्या-पिण्याच्या बदललेल्या सवयीने समाजाला अनेक घातक परिणामांना सामोरे जावे लागत असून घातक रोगांना बळी पडणाऱ्यांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. फास्ट फूडच्या अति सेवनाने शरीरावर होणाऱ्या परिणामाची माहिती असूनही खाऊ घालणारे आणि खाणाऱ्यांची संख्या कमी न होता ती दिवसागणीक वाढतच आहे. फास्ट फूडचे नियमित सेवन शरीरावर दीर्घकालीन आणि गंभीर परिणाम करू शकते. अशा या फास्ट फूडमध्ये भरपूर कॅलरिज, ट्रान्सफॅट, मीठ आणि साखरेचे प्रमाण सर्वाधिक असते. त्यामध्ये शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्त्वे, खनिज आणि फायबरचे प्रमाण शून्य असते. असे पदार्थ खाल्ल्याने शरीरास त्वरित ऊर्जा मिळत असली, तरी ती ऊर्जा संपतेही तेवढ्याच लवकर. त्यामुळे शरीर सुस्त बनून माणसाच्या काम करणाऱ्या क्षमतेवर त्याचा गंभीर परिणाम होतो. फास्ट फूडमधून शरीरास पोषक तत्त्व मिळत नसल्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊन शरीर अनेक व्याधींचे माहेरघर बनते. या फास्ट फूडपायी लहान मुले तर अक्षरशः वेडी झाली आहेत. पिझ्झा, बर्गर, नूडल्स, मोमोज, केक, पेस्ट्री यांसारख्या पदार्थांना मुलांची प्रथम पसंती असते. परिणामाची चिंता न करता पालकही आपल्या पाल्यांना आनंदाने त्याचा घास भरविण्यात धन्यता मानत आहेत. त्यामुळे पूर्वीच्या काळामध्ये शरीराला पोषक तत्त्व देणारी भाजी, भाकरी, पोळी, वरण, भात यांसारखे पारंपरिक पदार्थ ताटामध्ये दिसून येत नाहीत. नैसर्गिक पदार्थावर प्रक्रिया करून तयार होणारा पदार्थ शरीरासाठी अतिशय घातक आणि हानिकारक असतात. निसर्ग निर्मित वस्तूचे सेवन नैसर्गिकरीत्या केले तरच ते शरीरासाठी उपयुक्त ठरतात. फास्ट फूडमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट फार अधिक प्रमाणात वापरले जात असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास होण्याची शक्यता सर्वाधिक असते. फास्ट फूडमध्ये ट्रान्सफॅटचे प्रमाणही सर्वाधिक असते;



जे शरिराला आतून पोखरण्याचे काम करते. फास्ट फूडमध्ये अधिकची साखर, चरबी व मीठ त्यास चवदार बनवितात. परंतु, या तीन पदार्थामुळे हृदयावर त्याचा गंभीर परिणाम होऊन लोक आजारी पडतात. फास्ट फूडमधील ट्रान्सफॅटमुळे रक्तामधील वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढून चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. त्यामुळे टाईप-२ या प्रकारामधील मधुमेह हा आजार होण्याचा धोका अधिक बळावतो तसेच हृदयविकाराचा धोकाही कितीतरी पटीने वाढतो. आहारामध्ये मिठाचे सेवन वाढल्याने उच्च रक्तदाबाचा त्रास होण्याचा धोका अधिक असतो. फास्ट फूडमध्ये कॅलरिजचे प्रमाण सर्वाधिक असल्याने लठ्ठपणा हमखास वाढतो. लठ्ठपणा वाढला की, दमा आणि श्वसनासंबंधी इतर अनेक आजार होण्याचा धोका कितीतरी पटीने वाढतो. असे हे विष खाऊन काही काळासाठी आपली भूक भागत असली, तरी त्याच्या दुष्परिणामांची चर्चा होताना समाजामध्ये कधीच दिसून येत नाही. ज्या व्यक्तींना फास्ट फूड खाण्याची सवय आहे, अशा व्यक्तींना नैराश्याने बाधित होण्याची शक्यता ५१ टक्के अधिक असते. तर, दुसरीकडे शरीरामधील हार्मोन्सवर त्याचा परिणाम होऊन प्रजनन क्षमतेवरही त्याचे गंभीर परिणाम होत असल्याचे मत अभ्यासकांनी वर्तविले आहे. फास्ट फूडच्या अति सेवनाने घातक आजारांचे प्रमाण वाढत असतानाच मागील दोन दशकामध्ये हे आजार होण्याचे वयही २५ ते ३० वर्षे एवढे खाली आले आहे. फास्ट फूड तयार करताना ते अधिक काळ पाकिटामध्ये टिकावे यासाठी त्यामध्ये अनेक रसायनांचा भडीमार केलेला असतो. आपणास या सर्व बाबींची कल्पना असूनही त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करून दिवसेंदिवस त्या विषाच्या आहारी आम्ही जात आहोत. शरीराला अपाय करणारे पदार्थ जर ठासून पोटामध्ये भरत राहिलो तर त्याची प्रतिक्रिया निश्चित होणार, हे आम्हाला समजत असले, तरी ते उमगत नाही, ही शोकांतिका आहे. पैसे खर्च करून आम्ही आजार विकत घेत आहोत आणि त्या आजाराच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपये पाण्यासारखे खर्च करून धन्यता मानण्यात आयुष्याची राखरांगोळी करीत आहोत. देशाचे भविष्य घडविणाऱ्या पिढ्या अशा प्रकारे कमजोर होत गेल्या तर भविष्यामध्ये आपल्या पुढ्यात काय ठेवले असेल, हे सांगण्यासाठी कोण्या भविष्यवेत्त्याची गरज नक्कीच नाही.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# 'लव्ह जिहाद'चे व्यवस्थापकीय संदर्भ

दत्तात्रेय आंबुलकर

नाशिकच्या टाटा कन्सलटन्सी अर्थात टीसीएस या प्रथितयश कंपनीत योजनापूर्वक झालेल्या 'लव्ह जिहाद'चे प्रकरण आणि त्याचा भीषण तपशील उघड झाल्यापासून या धक्कादायक प्रकरणाचे गांभीर्य कंपनी प्रशासन, पोलिस विभाग, स्थानिक प्रशासन, कंपनी कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांना जाणवले आहे. मुख्यतः टाटा समूहातील कंपनीत कर्मचाऱ्यांनी योजनापूर्वक पद्धतीने आपल्या सहकारी महिला कर्मचाऱ्यांचे शारीरिक शोषण, अत्याचार असे भीषण प्रकार करून त्याची भीषण परिणीती लक्षणीय संख्येतील लव्ह जिहादमध्ये झाल्याने त्याचे परिणाम टाटा उद्योग समूहांतर्गत टाटा सन्सपासून टाटांचे मुख्यालय असणाऱ्या बॉम्बे हाऊसपर्यंत सर्वदूर उमटणे स्वाभाविक होते व झालेही तसेच.

यासंदर्भातील कंपनी-कर्मचारी आणि व्यवस्थापकीय संदर्भातील पृष्ठभूमी म्हणजे, कंपनी कर्मचाऱ्यांनी महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण करून, प्रलोभन, भीती दाखवून त्यांच्यावर जबरदस्तीने व बळपूर्वक लव्ह जिहादच्या नावाखाली झालेले भयानक प्रकार. व्यापक कायदेशीरसंदर्भात संवैधानिकच नव्हे, तर धार्मिक, सामाजिक व भावनिक परिणाम पाहता, प्रसंग आणि परिस्थितीचे गांभीर्य साहजिकच वाढले आहे. मूलतः मुद्दा उपस्थित होतो, तो टाटा उद्योग समूहांतर्गत व्यवस्थापनाची कार्यपद्धती-संस्कृती कामकाजाची परंपरा व त्याचवेळी कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित असणाऱ्या शिस्तपूर्ण व्यवहाराची. हे दोन्ही मुद्दे यासंदर्भात महत्त्वाचे व चिंतनीय ठरतात.

सकृतदर्शनी सांगायचे झाल्यास, कायद्याच्या मूळ निर्देशांनुसार १९६१ च्या औद्योगिक स्थायी आदेशात प्रामुख्याने नमूद केलेल्या कलम २२ अंतर्गतच्या 'झेड'या तरतुदींनुसार, मुळातच प्रत्यक्षाप्रत्यक्ष व हावभाव-संवादासह केलेल्या सर्वच प्रकारच्या गैरकृत्यांना कर्मचाऱ्याने केलेली गैरवर्तणूक ठरविण्यात आली असून त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यावर नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार व्यवस्थापनाला कायद्यांतर्गत देण्यात आले आहेत. त्यानुसार या मार्गदर्शक व महत्त्वाच्या तरतुदींनुसार उद्योगांतर्गत शिस्तभंगाची कारवाई होणे केवळ अपेक्षितच नव्हे, तर आवश्यक अशी प्रथा-परंपरा ठरली आहे. कंपनी-कर्मचाऱ्यांच्या संदर्भात कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांचे कुठल्याही प्रकारे लैंगिक शोषण होऊ नये, या उद्देशाने केंद्र सरकारतर्फे महिला लैंगिक अत्याचार नियंत्रणाच्या संदर्भात 'पॉश' म्हणजेच प्रिव्हेंशन ऑफ सेक्शुअल हर्रासमेंट या विशेष कायद्याची निर्मिती करून त्याच्या काटेकोर अंमलबजावणीवर भर दिला जात आहे. 'पॉश' कायदा वैधानिकदृष्ट्या सर्वच आस्थापना-कार्यालये व कंपन्यांना लागू करून आवश्यक त्या कारवाईसह अंमलबजावणी सक्तीची करण्यात आली आहे, हे उल्लेखनीय आहे. महिला कर्मचाऱ्यांचे कामाच्या ठिकाणी कुठल्याही संदर्भात लैंगिक शोषण न होण्याची खातरजमा करण्यासाठी व 'पॉश' कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आस्थापनेतील महिला कर्मचाऱ्यांसाठी पॉश अंतर्गत, कंपनी अंतर्गत तक्रार निवारण समिती गठित केली जाते. या समितीमध्ये महिलांशी संबंधित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी व्यक्तीचा समावेश करून पॉश अंतर्गत महिला कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक तक्रारीवर चौकशी करून, त्यांचे कालबद्ध स्वरूपात चौकशीसह कारवाईचा अहवाल समितीने कंपनी प्रशासनासह संबंधित ठिकाणच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना कळविणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांना आवश्यक ते संरक्षण देणे व त्याचवेळी त्यांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे झालेल्या अथवा होणाऱ्या लैंगिक शोषणाच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचे कालबद्ध स्वरूपात निवारण करण्याच्या संदर्भात अत्यंत संवेदनशील असणाऱ्या पॉश कायद्याची टीसीएस प्रकरणी कशी पायमल्ली झाली, याची मूलभूत पडताळणी व्यवस्थापनाच्या संदर्भात महत्त्वाची ठरते. कंपनीच्या व्यवस्थापनाची यासंदर्भातील सकृतदर्शनी बेजबाबदार व विषयाशी संबंधित महिला साहाय्यक व्यवस्थापक यांच्या बेपर्वा वृत्ती आणि कृतीची सखोल चौकशी होणेपण तेवढेच आवश्यक ठरते. प्रकरणाची व्याप्ती व गांभीर्य लक्षात घेता, टीसीएस कंपनीतील महिलांचा छळ, त्यांचे झालेले ब्लॅकमेलिंग व त्यातून लव्ह जिहादची झालेली व्यापक परिणीती, ही बाब तपासाच्या पहिल्याच टप्प्यात स्पष्ट झालेली दिसते. आता अधिकृतपणे स्पष्ट झाल्यानुसार, कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, अत्याचार, लैंगिक शोषण व धार्मिक भावना दुखावण्याचाच अंतिम टप्पा म्हणून लव्ह जिहादचा सामूहिक प्रकार होण्याच्या योजनाबद्ध व विकृत जिहादी प्रकरणाची तपास-चौकशी करण्याचे काम घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, केंद्रीय गुप्तचर यंत्रणा, राज्य गुप्तवार्ता विभाग, राष्ट्रीय तपास यंत्रणा यांच्याकडे सोपविल्यामुळेच या प्रकरणी लव्ह जिहाद घडवून आणण्यासाठी विदेशी पैशाचा मोठा वापर झाल्याचे लक्षात आल्याने, केवळ टीसीएस व्यवस्थापनच नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थापन क्षेत्र स्वाभाविकपणे हादरले आहे. राष्ट्रीय महिला आयोगानेदेखील या प्रकरणाची वेळेत दखल घेतल्याने एकूणच तपास प्रक्रियेला निश्चितच बळकटी मिळाली आहे. आयोगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश साधना जाधव, हरयाणाचे माजी पोलिस संचालक बी. के. सिन्हा, सर्वोच्च न्यायालयातील वकील मोनिका अरोरा व राष्ट्रीय महिला आयोगाच्या वरिष्ठ समन्वयक लीलावती यांचा या चौकशी समितीत समावेश केला आहे. आता नव्यानेच संमत झालेल्या महाराष्ट्र धर्मांतरण विरोधी कायद्याच्या नव्या पृष्ठभूमीवर या प्रथम चाचण्या निश्चितच लक्षणीय ठरणार असून त्यालाच जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायदान पद्धतीची आवर्जून जोड द्यायला हवी.

वरील प्रमुख मुद्यांशिवाय व्यवस्थापन क्षेत्राच्या संदर्भात दोन प्रमुख मुद्यांचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. एक म्हणजे, व्यवस्थापनांतर्गत कंपनी-कर्मचारी संवाद. केवळ वाद-तक्रारीच नव्हे, तर सर्वसाधारण स्थितीत कंपनी-कर्मचारी यांच्यात संवाद असायलाच हवा. त्याला व्यवस्थापक व सहकारी कर्मचाऱ्यांमधील संवादाची साथ दिली, तर ते सर्वांच्याच फायद्याचे व व्यावसायिकदृष्ट्या परिणामकारक ठरणार आहे. दुसरा व तेवढाच महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मोठ्या प्रमाणात विकृत मनोवृत्तीतून व जात्यंध धार्मिक भावनेपोटी योजनाबद्ध पद्धतीने आपल्या महिला सहकाऱ्यांचे शारीरिक शोषण करून, त्यांचे जिहादी भावनेतून धर्मांतरण करणाऱ्या या प्रकरणाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेऊन त्यानुसार चौकशीसह कारवाई सुरू झाली असताना, त्याच गांभीर्याने व तातडीने प्रमुख व राष्ट्रीय स्तरावरील कर्मचारी-कामगार संघटनांनी या प्रकरणी आवाज उठवणे अपेक्षित असते. एरवी कर्मचाऱ्यांवर वैयक्तिक वा सामूहिक संदर्भात कर्मचारी-सहकाऱ्यांवर कुठलाही अन्याय झाल्यास त्याविरुद्ध आवाज उठवून प्रसंगी आंदोलनात्मक पवित्रा घेणाऱ्या प्रमुख कामगार संघटनांनी नाशिक लव्ह जिहादप्रकरणी ठोस भूमिका घेणे अपेक्षित होते. असे झाले, तर सध्या ठरवून कॉर्पोरेट उद्योग-व्यवसाय क्षेत्रात कर्मचारी निवड-ठेकेदारी एवढेच नव्हे, तर विशेषतः माहिती-तंत्रज्ञान व संगणक व्यवसाय क्षेत्रात शिरकाव झालेल्या व योजनापूर्वक पद्धतीने उद्योग-व्यवसायासाठी संबंधित अशा महत्त्वाच्या व विशेषतः संवेदनशील माहिती-तंत्रज्ञानाची जिहादी मानसिकतेचे तस्करी करणाऱ्यांच्या प्रयत्नांना खीळ बसू शकेल, ही मोठी व महत्त्वपूर्ण बाब नाशिक लव्ह जिहाद प्रकरणातून अधोरेखित झाली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### महापालिकेच्या कामांत सहभाग


आपण दरवर्षी महानगर पालिकेकडे मालमत्ता कर भरतो. त्यासाठी महापालिका आपल्याला काही नागरी सुविधा पुरवते. या नागरी सुविधांमध्ये कुठेही कमतरता भासली की आपण महापालिकेला दोष देत राहतो. महापालिकेकडून वर्षभर नवीन अथवा दुरुस्तीची कामे सुरू असतात. या कामामुळे नागरिकांना बराच त्रासही सहन करावा लागतो. आपण सोयीस्कररीत्या प्रशासन व महापालिकेला नाव ठेवत असतो.पण एक जागरूक नागरिक म्हणून आपण काय करतो याचा विचार होणे गरजेचे आहे. पावसाळ्याआधी महापालिका रस्त्याच्या बाजूच्या नाल्या स्वच्छ करतात. काही नागरिक खाद्यपदार्थांचे वेष्टण, प्लॅस्टिक प्लेट्स आणि चमचे खिडकीतून बाहेर फेकून देतात, ते नष्ट होत नाही व ड्रे मध्ये अडकून रस्त्यावर पाणी साचते. काही जण वापरलेले काही प्लॅस्टिक-वस्तू कचराकुंडीत न टाकता थेट ड्रेनमधून फ्लश करून देतात त्यामुळे सिवेज पाईपलाईन ब्लॉक होते. काही अशा ठिकाणी गाड्या पार्क करतात की पालिकेला ड्रेन साफ करता येत नाही. काही लोक ओला कचरा व सुका कचरा यांच्यामध्ये वर्गीकरण करत नाही. खरेदीसाठी मार्केटमध्ये जाताना पुनर्वापर करण्यायोग्य कापडी पिशव्या न घेता प्लॅस्टिकच्या कॅरीबॅग वापरतो. सबब, सतत महापालिकेला दोषी न ठरवता आपण या शहराची काळजी घ्यावी व एका जबाबदार नागरिकाप्रमाणे वागून महापालिकेला सहकार्य करून आपले शहर सुंदर केले पाहिजे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

### 'आशा' नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला

'आशा' नावाची एक अजब साखळी आहे. ती माणसाच्या पायी बांधलेली असेल तर तो धावू लागतो. ती बेडी पायातून विलग झाली, की माणूस अगतिक होतो; पांगळा होतो. आशा हे माणसातल्या गतिमानतेचं एकमात्र कारण आहे. आशाताई भोसले हे देखील त्याच गतिमानतेचं सांगीतिक प्रतिरूप आहे. भारतीय संगीत रसिकांसाठी जसा 'लता' हा एकेरी संबोधनाचा शब्द, तसाच 'आशा'



हादेखील! आशाच्या जाण्यामुळे सांगीतिक गतिमानतेचं एक चक्र थांबलं. गाणारे खूप झाले, पुढेही होतील. प्रत्येकाची जीवनचक्रं कधी ना कधी थांबणारच. पण आशा नावाचं हे चक्र हे काही साधंसुधं नव्हतं. ते सुदर्शनासारखं दैवी होतं अन् धारदार होतं! बिजलीसारखा लखलखीत, भेदक आणि अमोघ असलेला तो आशेचा स्वर अद्वितीय असा होता. लता म्हणजे भगवंताची बासरी, तर आशा म्हणजे त्याचं सुदर्शन! सुरेश भटांनी आशेच्या स्वरांना बिजलीसम तळपत राहण्याच्या शुभेच्छा दिल्या होत्या. आशेचा स्वर म्हणजे इंद्रधनु! मानवी भावविश्वाच्या साऱ्या रंगांना त्या इंद्रधनुष्याने चितारले. शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, शांत अशा नऊही रसांना त्या स्वराने संपूर्ण न्याय दिला. भजनातली आर्तता, कॅब्रेतली मादकता, अंगाईतले वात्सल्य, बालगीतातली निरागसता, प्रेमगीतातला प्रणय, विराणींमधला विरह, मुजऱ्यांमधली नजाकत, लावण्यांमधला ठसका, आधुनिक गाण्यांमधला धिंगाणा, गझलांमधली कशिश, नाट्यसंगीतातला बाज, शास्त्रीय संगीतातली गरिमा- हे एकाच गळ्यातून इतकं अचूक कसं काय प्रकटू शकतं; हे आशाला ऐकून सतत वाटत राहतं. सर्वार्थानं व्हर्सटाईल म्हणावी अशी एकमेव गायिका म्हणजे आशा! आशा पुन्हा होणे नाही. तसे गाणेही आता होणे नाही. एक मात्र खरं. आशेच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली, ती भरू शकते केवळ तिच्याच गाण्याने! आशा अजर आणि अमर असते!

**डॉ. प्रसाद प्रकाश देशपांडे**/९८२२८२८५४४

### उष्णता प्रतिबंधक योजना

२७ एप्रिल २६ च्या अंकाच्या मुखपृष्ठावरील 'विदर्भावर 'रवि'वार' हे शीर्षक खूप भावले. सूर्य अक्षरशः आगरूपी वार करीत आहे. सकाळपासूनच सुरू झालेल्या उष्ण झळा रात्री ११ वाजेपर्यंत असतात. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे प्रचंड हाल होतात. रात्री विजेचा पुरवठा मध्येच बंद झाला तर झोपेचे खोबरे होते.

भर दुपारी उन्हात फिरणाऱ्याची चिंता वाटते. ते घरी बसले तर खातील काय? प्रत्येक चौकात सिग्नलवर दुचाकी वाहकासाठी सावली मिळावी म्हणून हिरवी जाळी लावण्याची वार्ता वाचण्यात आली. पण अजूनही अनेक चौक तसेच आहेत. महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांची 'कूर्म गती'ने पावसाळा उजाडेल असे वाटते. सध्याचे वाढते तापमान बघता सर्व उपाययोजना तातडीने अंमलात आणल्या तरच त्यांचा लाभ मिळू शकतो. अधिकारी वर्ग याकडे लक्ष देतील, अशी अपेक्षा करण्यास हरकत नसावी.

**संजय पाठक**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## पुंडलीक पाटील टेनिस क्लबचे चौघे अजिंक्यपदाचे मानकरी

### जिल्हा टेनिस प्रिमियर लीग स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

समाज कल्याण केंद्र लॉन टेनिस क्लबवर झालेल्या टेनिस प्रिमियर लीग स्पर्धेत पुंडलीक पाटील टेनिस अकादमीच्या चौघांनी अजिंक्यपद व दोघांनी उपविजेतेपद पटकाविले. शौर्य बेंद्रे याने १० वर्षांखालील गटात, ऋषिकेश चव्हाण याने १२ वर्षांखालील गटात, यशवंतराजे पवार याने १४ वर्षांखालील गटात तर रुद्रप्रताप चव्हाण याने १६ वर्षांखालील गटात ही कामगिरी केली. त्यांना पुंडलीक पाटील टेनिस क्लबचे संगमनाथ नागोजी आणि प्रशिक्षक सुधीर सालगुडे व पूजा सालगुडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## संगमेश्वर रात्र महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांना पीएच.डी.

**सोलापूर, दि. २७ एप्रिल -**



सोलापूर येथील संगमेश्वर रात्र महाविद्यालयातील प्रा. शरणबसवेश्वर सिद्धाराम वांगी यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. STUDY OF EFFECT OF YOGIC EXERCISES ON SELECTED PHYSICL FITNESS ND PHYSIOLOGICL VRIBLES OF HNDBLL PLYERS OF SOLPUR DISTRICT या महत्वपूर्ण विषयावर संशोधन प्रबंध सदर केला होता. संशोधन कार्य हिराचंद नेमचंद कॉमर्स कॉलेज येथील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. किरण चौगुले यांच्या मार्गदर्शना खाली तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील डॉ.अनिल कांबळे यांच्या मार्गदर्शनाने त्यांनी हे संशोधन पूर्ण केले. प्रा. वांगी यांना त्यांच्या संशोधनाकरिता डॉ. आनंद चव्हाण डॉ.समर्थ मनुकर ,डॉ. मुस्ताक शेख डॉ.किरण चोकाककर ,डॉ.रेवप्पा कोळी, श्री. मोहन काळे, प्रा.विक्रांत विभुते, प्रा. शिवराज पाटील, प्रा. संतोष खेंडे, यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी, संस्थेच्या सचिव ज्योती काडादी,प्राचार्य डॉ.आर.पी. बुवा ,संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. गोटे सर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## कंबर तलावच्या बोटिंग ऑफिसमध्ये रक्षकाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर,दि. २७ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका ६६ वर्षीय वॉचमनने पत्र्याच्या लोखंडी अँगलला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कंबर तलावच्या बोटिंग ऑफिसमध्ये सोमवारी सकाळी साडेदहा वाजता उघडकीस आली.ताहेर कासिम शेख (वय ६६ वर्ष, रा. २ नंबर झोपडपट्टी, विजापूर रोड, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या त्या रक्षकाचे नाव आहे. विजापूर रोडवरील कंबर तलाव मधील बोटिंग ऑफिसमध्ये यातील मृत ताहेर शेख हे वॉचमन म्हणून काम करत होते. आज सोमवारी सकाळी जेव्हा बोटिंग ऑफिसमधील कर्मचारी हे कामाला तेथे आले तेव्हा आतील बाजूस ताहेर हे गळफास घेतलेल्या अवस्थेत इतर कर्मचाऱ्यांना आढळून आले. कर्मचाऱ्यांनी त्वरित सदर बाजार पोलीस ठाण्याला ही माहिती दिली.यादरम्यान मृत ताहेर यांचे नातेवाईक ही घटनास्थळी जमा झाले. तोपर्यंत सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार के एम राठोड यांनी पोहोचून नातेवाईकांच्या साह्याने गळफास सोडवून ताहेर शेख यांना खाली उतरविले व येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मयत ताहेर शेख यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली नातवंडे असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.



# समृद्धी स्पोर्टस्चे किशोर, किशोरी उपांत्य फेरीत

## वाफळे भीमशक्ती तरुण मंडळाच्या जिल्हा खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल -**

जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत येथील समृद्धी स्पोर्टस् क्लबने किशोर व किशोरी दोन्ही गटातून उपांत्य फेरी गाठली.

वाफळे (ता. मोहोळ) येथील भीमशक्ती तरुण मंडळाने ही स्पर्धा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केली आहे. वाफळे येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते संघटक श्रीकांत ढेपे व आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू अश्विनी शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष अजितकुमार संगवे, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सचिव उमाकांत गायकवाड, वाफळे येथील प्रा. दादासाहेब पाटोळे, दादासाहेब मुसळे, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव, शंकर दाढे, महादेव जवंजाळ, मुख्याध्यापक रामेश्वर चव्हाण, विश्वजीत देशमुख, गणेश नाईकनवरे, सेवानिवृत्त पीएसआय हनुमंत जवंजाळ, अशोक जवंजाळ, विठ्ठल जवंजाळ, विनोद नाईकनवरे, नानासाहेब चव्हाण, सागर जवंजाळ, अविनाश अंधारे, विजय जवंजाळ, शांतीलाल नाईकनवरे, राजाभाऊ जानराव, कवी कांबळे, कुमार जवंजाळ आदी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत भीमशक्ती तरुण मंडळाचे अध्यक्ष अनिल माने, खजिनदार अण्णा नाईकनवरे, संयोजन समिती सदस्य श्रीकांत जवंजाळ यांनी केले. राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ यांनी सूत्रसंचालन केले.

### असे होणार उपांत्य सामने

**किशोर :** छत्रपती शाहू क्लब सोलापूर विरुद्ध दिन बंधू क्लब मंद्रूप, समृद्धी स्पोर्ट्स क्लब सोलापूर विरुद्ध शेवते.

**किशोरी :** जिल्हा परिषद शाळा वाफळे विरुद्ध छत्रपती शिवाजी प्रशाला वीट, समृद्धी स्पोर्ट्स क्लब सोलापूर विरुद्ध के.के. स्पोर्ट्स क्लब वाडीकुरोली.



## स्वामी विवेकानंद नगरात एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

अज्ञात कारणावरुन एका ४७ वर्षीय इसमाने राहत्या घरात लोखंडी अँगलला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हत्तुरे वस्ती परिसरातील स्वामी विवेकानंद नगरात सोमवारी उघडकीस आली. लक्ष्मीकांत अण्णाप्पा अचलेरे (वय-४७, रा.स्वामी विवेकानंद नगर, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी दुपारी लक्ष्मीकांत अचलेरे यांनी घरामध्ये गळफास घेतला असल्याचे आढळून आले. विजापूर नाका पोलिसांना ही खबर समजली असता हवालदार एम.जी.बहिर्जे यांनी घटनास्थळी पोहोचून नातेवाईकांच्या सहाय्याने गळफास सोडवून मृतदेह येथे शासकीय रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

**जाहीर नोटीस**

दि. कि. अर्ज नंबर १९/२०२६
नि. नं. ५

**माढे येथील मे. दि. न्या. क. स्तर सो. यांचे कोर्टात**
(मा. श्री. पी. जी. लंबे साहेब कोर्ट)

**श्रीमती उमा रमेश पाटेकर** -- **अर्जदार**
**विरुद्ध**
**कोणी नाही** -- **सा. वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी मयत रमेश अंकुश पाटेकर, रा. कुर्डूवाडी, ता. माढा यांचे वारस आहोत म्हणून या मे. कोर्टात वारस सर्टिफिकेट मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, सदर रमेश अंकुश पाटेकर, रा. कुर्डूवाडी, ता. माढा यांचे अर्जदार वारस नाहीत अगर इतर वारस आहेत वगैरे बाबत कोणाचे काही म्हणणे तक्रार असल्यास तसे या कोर्टात हजर राहून नेमलेल्या तारखेस आपले हरकती नोंदविणेत यावेत व त्यास अनुसरून योग्य तो पुरावा द्यावा. केसची चौकशीकामी प्रत्येक तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे कोणी हजर न राहिल्यास कोणाचीही तक्रार नाही असे समजून याकामी पुढील योग्य तो निर्णय दिला जाईल.

कळावे
ही जाहीर नोटीस दिली तारीख २४/०४/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
सहा. अधीक्षक
माढा सिव्हील कोर्ट
कनिष्ठ स्तर माढा

**हरवले आहे**

उमेश भिमाशंकर जमादार यांचे नांवे खाते असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा अक्कलकोट रोड, पाणी टाकी, सोलापूर या बँकेवरील फक्त सह्या केलेले दोन कोरे चेक क्र. १०९४८१ व १०९४८२ व एक कोरा बॉण्ड पेपर गेंट्याल चौक गेंट्याल अपार्टमेंट ते पाणी टाकी अक्कलकोट रोड दरम्यान दि. २४/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजणेचे सुमारास हरविले आहेत, गहाळ झाले आहेत.

तरी वरील चेक व बॉण्ड पेपर कोणास सापडले असतील तर त्यांनी खालील पत्त्यावर आणून द्यावेत. ता. २७/०४/२०२६

**उमेश भिमाशंकर जमादार**
रुक्मिणी अपार्टमेंट, दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, सोलापूर
मो. नं. ९०९६१८८८७१

**नावात बदल**

मी. **समीना अय्युब पटेल** याद्वारे घोषित करते की माझे जुने नाव **समीना बेगम इब्राहिम सय्यद** बदलून **समीना अय्युब पटेल** असे करण्यात आले आहे. **रा.** ४१९/१७, शास्त्री नगर सोलापूर.

**CHANG IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME **CHOUGHULE SURAJ BHARAT** HAS BEEN CHANGED TO **CHOUGULE SURAJ BHARAT** AT POST KASEGAON, TAL SOUTH SOLAPUR, DIST SOLAPUR

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**ई-निविदा सूचना क्र. ०३ सन २०२५-२६ (दुसरी मागणी)**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत सोलापूर शहर भुयारी गटार योजनेचे देसाई नगर येथे नव्याने वीज जोडणी इत्यादी कामाचे संकल्पना, पुरवठा, उभारणी करणे व यशस्वीरीत्या चाचणी देणे या कामाची बी-१ ई-निविदा सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचेकडून र.रु.११९.०० लक्ष इतक्या रकमेची मागविण्यात येत आहे. निविदेचा सविस्तर तपशील दि. २७/०४/२०२६ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

Tender ID-2026_2026_SMC_1297324_1

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 159686365 & 1061132934 | मालमत्तेवर कर्ज | 1. पवन लक्ष्मण सुरवसे<br>2. कांचन लक्ष्मण सुरवसे<br>3. लक्ष्मण दत्तात्रय सुरवसे | 08/04/2026 | INR 9,53,457.21/- |

**मालमत्तेचा पत्ता:** कोंडभावी ग्रामपंचायत मिलकट क्र. १७६ असलेली गावठाण येथील निवासी मालमत्तेचा तो संपूर्ण तुकडा, क्षेत्रफळ ७७० चौरस फूट, जो कोंडभावी ग्रामपंचायतीच्या हद्दीत, तालुका: माळशिरस, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१ येथे स्थित आहे आणि ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व: रस्ता पश्चिम: लालसो सुरवसे उत्तर: महालक्ष्मी मंदिर दक्षिण: दौलत सुरवसे

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

दिनांक : **28/04/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**जाहीर समन्स**

मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखे शेजारी,
सोलापूर-०१

**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर** -- अर्जदार
**-विरुद्ध-**
(खालील तपशिलातील नमूद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद) -- जाब देणार

| अ नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १२५२/ २०२५-२६ | २,०१,०९४.७० | १ | राठोड मिथुन राजू<br>रा. प्लॉट नं २८ काशी विश्वनाथ नगर आरपी फार्म हाऊस जवळ सोलापूर |
| | | | २ | राठोड जयसिंग शिवलाल<br>रा. टाकळीकर मंगल कार्यालय ३९१ सिंधु विहार जुळे सोलापूर |
| | | | ३ | जाधव अनिल गोपाळ<br>रा. घर नं १८ सुदर्शन लक्ष्मी नगर जुळे सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. १२/०५/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर राहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २४/०४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक,**
सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी
बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

# सोलापुरात ५ मे पासून रंगणार 'विजय चषक' क्रिकेट स्पर्धा

### माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन



**सोलापूर, दि. २७ एप्रिल -**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन आणि ग्रीन फिंगर्स स्कूल, अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने 'विजय चषक' एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर ५ मे पासून करण्यात आले आहे.

ही स्पर्धा बाद पद्धतीने खेळवली जाणार आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या संघास ११ हजार तर द्वितीय क्रमांकास ७ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येईल. याव्यतिरिक्त उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना ५ वैयक्तिक बक्षिसेही दिली जाणार आहेत. विशेष म्हणजे, ही स्पर्धा फक्त पहिल्या १६ संघांसाठी मर्यादित असून 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' दिले जाईल. स्पर्धेचा अंतिम सामना १२ जून रोजी खेळवण्यात येईल.

सोलापूर डिस्ट्रिक्ट असोसिएशनचे टूर्नामेंट कमिटी चेअरमन संजय वडजे यांनी सांगितले की, सर्व सामने सकाळी ९:३० वाजता सुरू होतील, त्यामुळे संघांनी सकाळी ९ वाजेपर्यंत उपस्थित राहणे आवश्यक आहे. जर एखादा संघ सकाळी १० वाजेनंतर मैदानात पोहोचला, तर प्रतिस्पर्धी संघाला 'बाय' देऊन पुढील फेरीत प्रवेश दिला जाईल. इच्छुक संघांनी ३ मे २०२६ पर्यंत राजू रंगम (मो. ९४२१०२७७८४) यांच्याकडे आपली नावे नोंदवावीत. याच दिवशी दुपारी १२ वाजता स्पर्धेचे गट निश्चित केले जातील.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे उपळाई (ठो.) येथील व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे उपळाई (ठो.) येथील जमिन गट नं. १०४१/३ क्षेत्र ०० हे. ८३ आर पो.ख ०० हे. ९ आर, एकूण क्षेत्र ०० हे. ९२ आर, आकार ०० रु. ९२ पैसे अशी पूर्ण गटाची जमिन आमच्या अशिलाचे बहिणीचा मुलगा वैभव कुंडलिक वैद्य यांचे नावे मालक व वहिवाटदार सदरी असून सदरील जमिन त्याच्या मालकीची आहे. सदरील जमिनीच्या लगत आमच्या अशिलाचे मालकीची जमिन गट नं. १०४१/७ अशी जमिन लगत असून या दोन्ही जमिनीच्या लगत काकरी बांध नाही.

वैभव कुंडलिक वैद्य हे मागील काही महिन्यापासून सदरी जमिन विक्री करण्याचे गावामध्ये बोलत आहेत. त्यामुळे आमच्या अशिलाने बाजार भावाने वैभव कुंडलिक वैद्य याचे बरोबर सदरील जमिन खरेदी करण्याची तयारी देखील दर्शविलेली होती. त्यावेळी आमच्या अशिलास डावलून इतर लोकांस सदरील जमिन विक्री करावयाची भाषा करु लागले आहेत. आमच्या अशिलाची जमिन लगत असल्याने कायद्यानुसार प्रथमतः सदरील जमिन खरेदी करण्याच्या अग्रहक्काने आमच्या अशिलास हक्क व अधिकार आहे व बाजार भावाने आमचे अशील सदरील जमिन खरेदी करण्यास तयार आहेत.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

वैभव कुंडलिक वैद्य रा. बाळे, ता. उत्तर सोलापूर यांनी त्याच्या नावे असलेली जमिन गट नं. १४१/३ क्षेत्र ०० हे. ९२ आर ही जमिन विक्री काढल्यास वैभव कुंडलिक वैद्य यांच्या बरोबर कोणीही गहाण, दान, लिन, लिज, कर्ज बोजा, हस्तांतरणाचा अथवा त्रयस्थ व्यक्तीचा हक्क प्रस्ताविक होईल असा कुठल्याही प्रकारचा व्यवहार कोणीही करु नये. याउपर कोणी व्यवहार केल्यास तो व्यवहार आमच्या अशिलाचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाची फसवणूक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १८/०४/२०२६

**सही/-**
**अशील**
**तानाजी चांगदेव शेळके**

**सही/-**
**ॲड. एस. एस. ठोंबरे**
सुयश निवास फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी
श्री. तानाजी चांगदेव शेळके,
रा. उपळाई (ठो.), ता. बार्शी, जि. सोलापूर
तर्फे ॲडव्होकेट
ॲड. श्री. एस. एस. ठोंबरे

अुत्तम सेवा

मंगळवार
दि. २८ एप्रिल २०२६

**नोकरीच्या शोधात**

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | | | |
| | संयुक्त सेवा पूर्व परिक्षा-२०२६ गट-ब (५५२ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार किंवा ऑफिसर असावे | ३८ पर्यंत<br>३१ पर्यंत | ३०/०४/२६ |
| २) | **केंद्रीय राखीव पोलीस बल CRPF** | | | |
| १ | वाहन चालक (३१७६ पदे) | दहावी व जड वाहन परवाना असावे | २७ पर्यंत | १९/०५/२६ |
| २ | ट्रेडसमन (५९२० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | |
| ३) | **चलन नोट मुद्रणालय** | | | |
| १ | ऑफिस असिस्टंट (२२ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग असावे | २५ पर्यंत | १९/०५/२६ |
| २ | ज्युनियर टेक्निशियन (४०८) | ITI (इले/इलेक्ट्रॉ /मशिनिस्ट / एसी / फिटर / प्रिंटींग / प्लेट मेकर / केमिकल) | २५ पर्यंत | |
| ३ | सुपरवायझर (९९ पदे) | पदवी/पदविका (६०%) (कॉम्प्यु/ आय.टी / मेकॅ/ एसी/ इले/ इलेक्ट्रॉ/ सिव्हील) | ३० पर्यंत | |
| ४) | **स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC** | | | |
| १ | स्टेनोग्राफर (७३१ पदे) | बारावी व स्टेनो उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | १५/०५/२६ |

**✲ मोफत सरकारी अपडेट ✲**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### पत्नीला घ्यायला सासरी आलेल्या जावयाला लाथाबुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

पत्नीला घेण्यासाठी सासरी आलेल्या एका जावयाला सासरच्या लोकांनी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील इकराई मळा येथे घडली. बोधीराज जितेंद्र बाबरे (वय-३०, रा.करकंब, ता.पंढरपूर) असे मारहाण झालेल्या जावयाचे नाव आहे. तो रविवारी पत्नीला आणण्यासाठी सासरवाडी येथे गेला असता त्याला अजय कसबे, रोहित कसबे, करिष्मा कसबे, रेखा कसबे यांनी रॉड, विटा व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात मार लागल्याने त्याला मंगळवेढा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारार्थ दाखल करण्यात आले.

### कोल्ड्रिंक्स का दिला नाही असे म्हणून एकास मारहाण

**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

तू मला पिण्यास कोल्ड्रिंक्स का दिले नाही, असे मिळून एका व्यक्तीला प्लास्टिक खुर्ची व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील जुनोनी गावात घडली. अण्णा आप्पा अवघडे (वय-४४) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास गावातील एका दुकानाच्या बाहेर अण्णा अवघडे यांना अरुण अवघडे, साहेबा अवघडे यांनी मारहाण केली. यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात ते स्वतः दाखल झाले.

### तरुणास केबल वायरने गळफास देण्याचा प्रयत्न

**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

घरगुती वादातून सात-आठ जणांनी मिळून एका तरुणास लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन केबल वायरने गळफास देण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील कचरेवाडी येथे घडली. आनंद दादाराव भोसले (वय-३६, रा.कचरेवाडी) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. शनिवारी सकाळी राहत्या घराजवळ घरगुती कारणावरुन रघुनाथ भोसले, किसन इंगोले आणि इतर सहा जणांनी मिळून मारहाण केली. यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने मंगळवेढाच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करुन येथील शासकीय रुग्णालयात तो स्वतः आज सोमवारी सकाळी दाखल झाला.

### दुचाकी घसरुन जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

दुचाकी घसरुन जखमी झालेल्या एका अठरा वर्षाच्या मुलाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात रविवारी मृत्यू झाला. लक्ष्मण रमेश कटरे (रा.जवाहर नगर, सोलापूर सध्या नवीन विडी घरकुल, सोलापूर) असे मयत युवकाचे नाव आहे. लक्ष्मण कटरे हा १५ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास मल्लिकार्जुन नगर येथून राहत्या घराकडे जात असताना कुंभारी टोल नाक्याजवळ दुचाकी घसरुन खाली पडून जखमी झाला होता. बेशुध्दावस्थेत त्याला कुंभारी येथील अश्विनी हॉस्पिटलमध्ये उपचार करुन पुढील उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दि.२१ एप्रिल रोजी बालकिसन गुडा यांनी दाखल केले होते. उपचारादरम्यान दि. २६ एप्रिल रोजी दुपारी मृत्यू झाला.

# सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा मंडळावर व्यावसायिक क्रीडा तज्ज्ञांना नाही स्थान?





## कुलगुरुंनी नियमाचा वेगळा अर्थ काढला

## शारीरिक शिक्षण संचालकाचीच केली नियुक्ती

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर (Board of Sports) व्यावसायिक क्रीडा तज्ज्ञांना स्थान दिले गेले नसल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, विविध क्रीडा क्षेत्रातील विश्वसनियता सिध्द केलेले, कुलगुरुंनी नामनिर्देशित केलेले तीन व्यावसायिक प्रतिनिधी नियुक्त करताना नियमाचा चुकीचा अर्थ काढत तत्कालीन व विद्यमान कुलगुरुंनी या मंडळावर शारीरिक शिक्षण संचालकाची नियुक्ती केल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा तयार करताना क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामध्ये सर्व समावेशक क्रीडा क्षेत्रातील तज ज्ञ व्यक्तीचा समावेश असावा, याचा विचार हा कायदा तयार करणाऱ्या समितीने केला होता. जेणेकरुन विद्यापीठाच्या क्रीडा विकासास गती मिळेल. महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील 57 2 (c) three professionals, nominated by the Vice-Chancellor with established credibility in different fields of sports; या तरतुदीनुसार क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ व्यावसायिक व्यक्तीच्या नियुक्ती कराव्यात, असे अपेक्षित आहे. परंतु सोलापूर विद्यापीठाने या नियमाचा चुकीचा अर्थ काढत तत्कालीन कुलगुरु प्रा.डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी या अगोदर २ शारीरिक शिक्षण संचालकाची आणि नंतर विद्यमान कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांनीही नुकतेच नियुक्त केलेले एक, हे तिन्हीही व्यक्ती शारीरिक शिक्षण संचालकच आहेत.

महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील 57 2 (f) two sports teachers, from affiliated, conducted or autonomous colleges,nominated by the Management Council; नुसार महाविद्यालयातील दोन क्रीडा अध्यापक या मंडळावर आहेत. हे या मंडळावर असताना कुलगुरुंनी परत शारीरिक शिक्षण संचालकाची नियुक्ती केली आहे. सद्यस्थितीत या मंडळावर 57 2 (c) नुसार एकही व्यावसायिक क्रीडा तज्ज्ञ व्यक्ती नियुक्त नाही. त्यामुळे क्रीडा अध्यापक वगळता क्रीडा क्षेत्रातील सोलापूर शहर व जिल्ह्यातील अनेक व्यावसायिक क्रीडा तज्ज्ञ व्यक्तींच्या सल्ल्यापासून विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ वंचित राहिले आहे.

### क्रीडा मंडळावर विविध व्यावसायिक तज्ज्ञांची गरज



मी हा मुद्दा व्यवस्थापन परिषदेमध्ये उपस्थित केला होता. परंतु नियमाचा वेगळा अर्थ काढत कुलगुरुंनी शारीरिक शिक्षण संचालक हे क्रीडा तज्ज्ञच आहेत, असे म्हटले आहे. २०१९ पूर्वी ३२ लाख रुपये वार्षिक अंदाजपत्रक असलेल्या क्रीडा विभागात मागील तीन वर्षापासून एक कोटीपेक्षा अधिक तरतूद खेळाडू व क्रीडा विकासासाठी केली आहे. मात्र सोलापूर जिल्ह्यात असणाऱ्या गुणवंत खेळाडूंवर लक्ष ठेवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तराचे मार्गदर्शक बोलावून प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे, मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शन व चर्चासत्राचे आयोजन करणे अपेक्षित होते. असे झाले असते तर राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचे गुणांकन वाढलेले दिसून आले असते. यासाठी क्रीडा क्षेत्रातील विविध व्यावसायिक तज्ज्ञ या मंडळावर असणे गरजेचे आहे. त्याबाबत मी कुलगुरुंकडे पाठपुरावा करीत आहे.

**- प्रा.सचिन गायकवाड, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य**

### पुणे विद्यापीठात व्यावसायिक क्रीडा तज्ज्ञांना स्थान

महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठाच्या कुलगुरुंनी ५७ २ (C) नुसार शारीरिक शिक्षण संचालकाची नियुक्ती न करता शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू, क्रीडा संघटक आणि ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय खेळाडूंना या मंडळावर स्थान दिले आहे. राज्यातील शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात अव्वल असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या मंडळावर मनोज एरंडे (जलतरण), निर्मल थोरात (खो खो, दोघे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त) आणि गायत्री मडकेकर (आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू) या तीन व्यावसायिक क्रीडा तज्ज्ञांना स्थान दिले आहे.

# श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर कॉरिडॉर प्रकल्पाचे काम गतीने चालू करणार




## उच्चस्तरीय समिती, शिखर समितीच्या सुचनेनुसार काम

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील ४ हजार १२० कोटींच्या कॉरिडॉर प्रकल्पाला राज्याच्या हाय पॉवर कमिटीकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे. आता शिखर समितीची मान्यता मिळताच या प्रकल्पाचे काम गतीने चालू करणार असल्याचा निर्वाळा जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.यांनी दिला.उच्चस्तरीय समितीची बैठक नुकतीच पार पडली असून, यात आम्ही तब्बल २ तास २० मिनिटे या कॉरिडॉरची माहिती दिली, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत मुख्य कॉरिडॉर प्रकल्पाची बांधणी, पालखी नगरप्रदक्षिणा, शहर रस्ते, नदीकाठचा परिसर विकास, सांडपाण्याची विल्हेवाट लावणे, घनकचरा व्यवस्थापन, भूसंपादन प्रक्रिया आदी विषयांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी उच्चस्तरीय समितीकडून या कॉरिडॉरच्या डिझाईन बदलाची सूचना आली.



त्यानुसार या प्रकल्पाच्या डिझाईनमध्येही दुरुस्ती करून घेतली आहे.

भक्त पुंडलिक मंदिरापासून कळस दिसावा, अशी सूचना आली होती; त्यानुसार दुरुस्त्या केल्या आहेत. या कॉरिडॉर प्रकल्पात १२ हजार स्क्वेअर मीटरमध्ये व्यावसायिक दुकानांची उभारणी करण्यात येणार आहे. यातील काही बाधितांना दुकाने मिळणार आहेत. शिखर समिती मंजुरीनंतर याचा जीआर निघेल. अवघ्या अडीच वर्षात कॉरिडॉर उभारणी करण्यात येणार आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### ३ कोटींच्या कामांचा व 'कॉरिडॉर'च्या कामांचा संबंध येत नाही

श्रीविठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी अधिक मासात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत बाजीराव पडसाळी येथील सुरु असलेली कामे दि.१७ मे २०२६ पर्यंत गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करावीत, अशा सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. ही कामे ७३ कोटी रुपयांची असून, याचा आणि कॉरिडॉरच्या कामाचा काही संबंध येत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



### 'भाविक'रुपी पर्यटकांची गर्दी ओसरली...


**सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिध्दरामेश्वर मंदिर येथे 'श्रीं'च्या दर्शनासाठी येणाऱ्या 'भाविक'रुपी पर्यटकांची वाढत्या तापमानामुळे गर्दी ओसरली असल्याचे दिसून येत आहे. सोमवारचे तापमान ४३.९ से. इतके होते. (छायाचित्र केवल तिवारी)**

### मागील भांडणावरुन दोन कुटुंबात हाणामारी

**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

मागील भांडणाच्या कारणावरुन गायकवाड व वाघमारे या दोन कुटुंबियांमध्ये हाणामारी झाली. यात दोन्ही कुटुंबातील सहा जण जखमी झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडकबाळ येथे सोमवारी सकाळी ७.३० वाजता घडली. प्रेमा सोनप्पा वाघमारे (वय-४५), सोनप्पा वाघमारे (वय-१७), करेप्पा सोनप्पा वाघमारे (वय-२१), सागर कट्यप्पा गायकवाड (वय-२७), कमोल कट्यप्पा गायकवाड (वय-२९), महानंदा कट्यप्पा गायकवाड (वय-५५) अशी जखमींची नावे आहेत. गायकवाड व वाघमारे कुटुंबात रविवारी भांडण झाले होते. या भांडणाच्या रागातून सोमवारी सकाळी ७.३० वाजता एकमेकांत हाणामारी झाली. मंद्रुप येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी ते स्वतः सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल झाले.

### डांबर, सिमेंटचे दर वाढले; कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनने दिला काम बंदचा इशारा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

आखाती देशांमधील युध्दजन्य परिस्थितीमुळे डांबर, सिमेंट, पेट्रोलियम पदार्थांचे दर वाढले आहेत. परिणामी सोलापूर महापालिकेच्या कामांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता निमर्ण झाली आहे. वरील विविध वस्तूंचे दर बाजारभाव नुसार न दिल्यास शहरातील कॉन्ट्रॅक्टर्सनी काम बंदचा इशारा दिला आहे. सोलापूर महापालिका कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष आर. के. दुधाळ यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देत ही गंभीर बाब मांडली आहे.

शहरात विविध विकास योजनांअंतर्गत सध्या डांबरी रस्ते, कॉंक्रीट रस्ते आणि इतर बांधकामाची कामे सुरु आहेत. मात्र, आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे डांबराच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. सिमेंट आणि डिझेलचे दरही सातत्याने वाढत असल्याने कामांचा खर्च प्रचंड वाढला आहे. सध्या डांबराचा तुटवडा जाणवत असून, आवश्यक प्रमाणात पुरवठा होईनासे झाले आहे.

डांबर, सिमेंट व पेट्रोलियम पदार्थांच्या सध्याच्या बाजारभावानुसार रेट ॲनालिसिस करुन नवीन दर लागू करावेत. जोपर्यंत हे दर स्थिर होत नाहीत, तोपर्यंत वाढीव दरानुसारच कामे देण्यात यावीत. महापालिकेकडून यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेतला गेला नाही तर शहरातील सर्व कामे बंद करुन आंदोलन छेडू, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे रस्ते, बांधकाम आणि इतर नागरी सुविधा प्रकल्पांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.




**नीरा नरसिंहपूर (ता.इंदापूर) येथे श्री लक्ष्मी नृसिंह मंदिरात नवरात्र उत्सव - २०२६ निमित्त मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या रंगीत विद्युत रोषणाईला आकाशातून चंद्राच्या शितल छायेची सुबक साथ लाभली आहे. त्यामुळे मंदिराचा परिसर लखख लखख दिव्याने उजळून निघाला आहे. त्याचे नयनरम्य छायाचित्र टिपले आहे अकलूजचे छायाचित्रकार केदार लोहकरे यांनी.**

# २४६ गावे, ५९९ वाड्या-वस्त्यांसाठी पाणीपुरवठ्याची तयारी अंतिम टप्प्यात

## पाणी टंचाईचा आराखडा तयार

## सीईओ कुशल जैन यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात सन २०२५-२६ या वर्षासाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून, त्यामध्ये २४६ गावे आणि ५९९ वाड्या-वस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. या आराखड्यासाठी अंदाजित १२०४.१ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. जिल्हा प्रशासनाने संभाव्य पाणीटंचाईला सामोरे जाण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

मागील वर्षातील टंचाई कालावधीचा आढावा घेतला असता, सन २०२३-२४ मध्ये २१४ टँकरद्वारे १८० गावे आणि १२७३ वाड्या-वस्त्यांना पाणीपुरवठा करण्यात आला होता. तर सन २०२४-२५ मध्ये ६९ टँकरद्वारे ५९ गावे आणि ५८७ वाड्या-वस्त्यांवर पाणीपुरवठा करण्यात आला होता. यंदाच्या २०२५-२६ च्या टंचाई आराखड्यात १७८ टँकरद्वारे १४७ गावे आणि ५८९ वाड्या-वस्त्यांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मार्च अखेर ४८ टँकर प्रस्तावित असतानाही एकाही गावाकडून मागणी आली नव्हती. मात्र, ११ एप्रिल २०२६ पासून उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथे एक टँकर सुरु करण्यात आला आहे. अक्कलकोट तालुक्यातील वसंतराव नाईकनगर, बार्शी तालुक्यातील भोयरे, तसेच माळिशरस तालुक्यातील पिंपरी आणि पळसमंडळ येथे मिळून एकूण चार टँकर प्रस्तावित करण्यात आले आहेत.

सन २०२५-२६ च्या टंचाई कालावधीसाठी ५१ टँकर फीडिंग ठिकाणांची नोंद करण्यात आली. यात ११ सार्वजनिक, ४० खासगी पाणीस्त्रोतांचा समावेश आहे. सन २०२४-२५ टंचाई कालावधीतील ८.१७ कोटी निधीची मागणी अद्याप प्रलंबित आहे. नळ पाणीपुरवठा विशेष दुरुस्ती अंतर्गत मंगळवेढा तालुक्यातील मौजे भोसेसह ३९ गावे प्रादेशिक योजना, पंढरपूर तालुक्यातील कासेगाव व ११ गावे प्रादेशिक योजनांना जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. संबंधित कामे निविदा प्रक्रियेच्या टप्प्यावर आहेत, असेही त्यांनी सांगितले.





## महत्वाचे...



### छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या धीरेंद्र शास्त्री यांच्यावर कारवाई करा

**काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांची मागणी**

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

नागपूर येथील कार्यक्रमात बोलताना धिरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यानी इतिहासाची आदलाबदल करून आपले आराध्य दैवत श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात अत्यंत चुकीचे वक्तव्य केले. या कार्यक्रमासाठी सत्ताधारी पक्षाचे वरिष्ठ नेते व्यासपिठावर उपस्थित होते. त्यांनी विरोध न करता केवळ बघ्याची भूमिका घेतली. अशा चुकीच्या वक्तव्यामुळे महाराष्ट्रातील जनतेच्या व शिवप्रेमीच्या भावना दुखावल्या आहेत. श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच त्यांना महाराष्ट्रात येण्यास कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी.अशी मागणीचे निवेदन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी सपकाळ साहेब यांच्या आदेशानुसार व माजी केंद्रीय गृहमंत्री श्री. सुशीलकुमारजी शिंदे साहेब व सोलापूरच्या लोकप्रिय खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी मा.निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर यांना देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष अशपाक बळोरगी,जिल्हा व्ही.जे.एन.टी.सेलचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण,सुदर्शन आवताडे, प्रा. सिद्राम सरवदे दत्तात्रय खडतरे,देवेंद्र सैनसाखळे, अकबर शेख, उत्तम कुमार वाघमारे, कुंडलिक जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### घरात प्रवेश करून तीन लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. २७ एप्रिल -**

उघड्या घरात प्रवेश करून चोरट्याने तीन लाख रुपयांचे सोन्याचे लक्ष्मी हार व बोरमाळ चोरून नेले. हिप्परगा येथील बाकळे नगरात आज सोमवारी सकाळी साडेसहा वाजता ही घटना उघडकीस आली .दरम्यान या चोरी प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी वैशाली जलकर ( वय-४८, रा-प्लॉट नं ५६ बाकळे नगर, हिप्परग्गा सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे . फिर्यादी या रविवारी रात्री साडेअकरा वाजता घरी उशी खाली सोन्याचे दागिने ठेवलेली पर्स घेऊन झोपल्या होत्या. पहाटे चोरट्याने घरामध्ये प्रवेश करून फिर्यादीने ठेवलेल्या पर्समधील एक लक्ष्मी हार, एक बोरमाळ असे तीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहे. .सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.




### ट्रॅक्टर उलटून तरुणाचा मृत्यू; माळशिरस तालुक्यातील बागेचीवाडी येथील घटना

**अकलूज, दि. २७ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील बागेचीवाडी येथील संतोष आबा धाईंजे (वय ३२) यांचा ट्रॅक्टर अंगावर पडून मृत्यू झाला. घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.संतोष धाईंजे हे पाटील वस्ती येथील 'भाग्यश्री तू या' हॉटेलमध्ये काम करत होते. शनिवार दि. १८ एप्रिल रोजी ते नेहमीप्रमाणे कामावर गेले नव्हते. त्याच दिवशी सचिन शिंदे रा. बागेचीवाडी यांनी सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर संतोष यांना चालवण्यासाठी दिला होता. संतोष हे शेतातील तालीवरून ट्रॅक्टर चालवत असताना अचानक तोल जाऊन ट्रॅक्टर उलटला. या अपघातात ट्रॅक्टर त्यांच्या अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. मृत संतोष धाईंजे यांच्या पश्चात दोन महिन्यांपूर्वीच बायपास शस्त्रक्रिया झालेली आई, पत्नी आणि दोन लहान मुली असा परिवार आहे.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज भाजपाचा विजयी मेळावा

**नगरपालिका, महानगरपालिका अन् जिल्हा परिषद नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंगळवारी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरात भाजपचा भव्य विजयी मेळावा होत आहे. जिल्ह्यातील नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकांमध्ये विजय मिळवलेल्या सदस्यांचा त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. यामुळे या पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

जिल्ह्यातील ११ पैकी १० नगरपालिका, जिल्हा परिषद, महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये भाजपला शहर-जिल्ह्यातील मतदारांनी एक हाती सत्ता दिली. ३० वर्षांच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच भाजपने स्वतःच्या ताकतीवर 'ना भुतो ना भविष्यती' असे यश मिळविले आहे. या यशामुळे जिल्ह्यात ११ पंचायत समिती पैकी १० पंचायत समितीवर भाजपचा सभापती, जिल्हा परिषदेत भाजपचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सोलापूर महापालिकेत एक हाती सत्ता येवून महापौर, उपमहापौर व काही विषय समिती सभापतीपदी पदाधिकारी विराजमान झाले आहेत. एवढं मोठं यश मिळाल्यानंतर कार्यकर्त्यांचं, मतदारांचं आणि खास करून निवडून आलेल्या सगळ्या सदस्यांचं अभिनंदन करावं व त्यांचा सत्कार करावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवार, दि. २८ रोजी सोलापूरमध्ये येत आहेत. यावेळी कार्यकर्त्यांचा मेळावा आणि पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा या दुहेरी कार्यक्रमांची गुंफण होणार आहे.



मळावयासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार राजन पाटील आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी तगडे नियोजन केले आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोमवारी सी.एम. दौऱ्याचे नियोजन, कार्यक्रमस्थळाची तयारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीबाबत सविस्तर चर्चा केली आहे. हा मेळावा हरिभाई देवकरण प्रशाला मैदानावर होणार आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मैदानाची प्रत्यक्ष पाहणी केली.



पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक विजय संपादन केला. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही जिल्ह्यातील नेत्यांना एकत्र आणत भाजपने मोठे यश मिळवले. विशेष म्हणजे, प्रथमच जिल्हा परिषदेत भाजपचा झेंडा फडकला. अशातच खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आपला सत्कार होणार असल्याचा मोठा आनंद सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, जिल्हा परिषद - पंचायत समितीचे सभासद आदींमध्ये दिसून येत आहे.

मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आगामी राजकीय वाटचालीबाबत मार्गदर्शन करण्याची शक्यता असल्याने जनमानसातही या मेळाव्याची प्रचंड उत्सुकता असल्याचे जाणवत आहे. भाजपच्या या विजयी मेळाव्यामुळे जिल्ह्यात राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत असून, कार्यकर्त्यांच्याही उत्साहाला पारावार राहिला नसल्याचे चित्र आहे.

#### मेळाव्याचा उत्साह आणि उत्सुकता

दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार होणार असल्याच्या भावनेने पदाधिकारी व त्यांच्या समर्थकांत अपार उत्साह आहे. तसेच मुख्यमंत्री भावी राजकीय वाटचालीबाबत सांगणार असल्याने त्याबाबत उत्सुकताही आहे. मुख्यमंत्र्यांनी वारंवार सोलापुरकडे आपले विशेष लक्ष असल्याचे सांगितले असल्याने आता ते विकासाच्या नवीन काय घोषणा करतात, याकडे सोलापूर शहर - जिल्हयातील नागरिकांचेही लक्ष आहे.

## खत-बियाणे विक्रेत्यांच्या संपाला बार्शीत प्रतिसाद

**कृषी सेवा केंद्रे ठप्प; खरीपावर संकट येण्याची चिन्हे**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २७ एप्रिल -**

महाराष्ट्र फर्टीलायझर्स, पेस्टीसाईड्स अँड सीड्स डिलर्स असोसिएशन यांच्या नेतृत्वाखाली २७ एप्रिलपासून राज्यभर खत, बियाणे व कीटकनाशक विक्रेत्यांनी बेमुदत बंद आंदोलन सुरू केले आहे. त्याला बार्शी तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्रे बंद ठेवली आहेत.

गेल्या ४ ते ५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासन व कृषी विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत विक्रेत्यांनी हा निर्णय घेतला आहे. ''विक्रेत्यांच्या हक्कासाठी एकजुटीने लढा'' या घोषणेखाली आंदोलन राबविले जात आहे. खत विक्रेते संघटनेचे बार्शी तालुका अध्यक्ष दिनेश सुपेकर यांनी सांगितले की, खत लिंकिंग ही विक्रेत्यांसाठी मोठी समस्या बनली आहे. तसेच आम्ही विक्री करत असलेले बियाणे व खते ही कंपनीकडून सीलबंद स्वरूपात येतात. त्यामध्ये दोष आढळल्यास दुकानदारांना आरोपी न धरता संबंधित कंपनीला जबाबदार धरणे आवश्यक आहे. श्रीपत पिंपरी येथील शेतकरी भारत ताकभाते यांनी संपामुळे शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होणार आहेत. सध्या खरीप हंगामाची पूर्वतयारीचे दिवस असल्याने खते व बियाणे उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे.



खत व बियाण्यांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या असतानाही विक्रेत्यांचा नफा वाढलेला नाही. तसेच तपासणीसाठी घेतलेल्या सॅम्पलमुळे फोडलेल्या बॅग्ज विक्रीयोग्य राहत नाहीत, त्याचा आर्थिक तोटा आम्हालाच सहन करावा लागतो. याचा परतावा शासनाने द्यावा.

**- दिनेश सुपेकर, अध्यक्ष खत-बियाणे विक्रेते संघटना बार्शी.**

खरीप हंगाम जवळ येत असताना हा संप अधिक काळ चालल्यास शेती क्षेत्रावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विक्रेते व शेतकरी दोघांच्याही हितासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा.

**- सागर सोत्रे, खत विक्रेते दुकानदार**

## बार्शीतील कॉलेज हॉस्टेलमध्ये विद्यार्थिनीची आत्महत्या

**३ महिन्यातील दुसरी घटना; चर्चांना उधाण**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि २७ एप्रिल-**

बार्शी तालुक्यातील जामगांव (आ) शिवार परिसरातील एका कॉलेजच्या मुलींच्या वसतिगृहात एका विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

बार्शी तालुका पोलीस ठाण्यात याबाबत अमित अशोक छपरे (वय ४६, रा. बार्शी) यांनी माहिती दिली. छपरे हे संबंधित महाविद्यालयात स्टोअर विभागात कार्यरत आहेत. सायंकाळच्या सुमारास कॉलेज कॅन्टीनमध्ये असताना हॉस्टेलमधून आरडाओरड ऐकू आल्याने ते घटनास्थळी धावले.

हॉस्टेलमधील ब्लॉक क्रमांक ४०१, रूम क्रमांक ६९ चा दरवाजा आतून बंद असल्याचे दिसून आले. दरवाजा ठोठावूनही प्रतिसाद न मिळाल्याने खिडकीतून पाहिल्यानंतर संबंधित विद्यार्थिनी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली.



मृत विद्यार्थिनीचे नाव वैभवी सतीश पाटील (वय १८) असून ती मूळची भिगवण (ता. इंदापूर, जि. पुणे) येथील रहिवासी होती. सध्या ती एम.आय.टी. कॉलेजच्या वसतिगृहात राहून शिक्षण घेत होती.

ही घटना सायंकाळी सुमारे ७.१९ ते ८.१५ वाजण्याच्या दरम्यान घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती तत्काळ कॉलेज प्रशासन व पोलिसांना देण्यात आली.

याप्रकरणी बार्शी तालुका पोलिसांकडून आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे. तीन महिन्यात याच हॉस्टेलमध्ये विद्यार्थिनीची ही दुसरी आत्महत्या आहे. तीन महिन्यात आत्महत्येच्या दोन घटनांमुळे उलट सुलट चर्चा होत आहेत.

## पालखीमार्ग, तळांवर सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी सुचविलेल्या कामांना प्राधान्य : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ एप्रिल -**

संतांच्या पालखींसोबत येणाऱ्या भाविकांना सोयी सुविधा मिळण्यासाठी पालखी मार्ग, पालखी तळ तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी सुचवलेली कामे प्राधान्याने पूर्ण करणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी सांगितले.



आषाढीयात्रेच्या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांची बैठक झाली. बैठकीस मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, प्रांत अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच दहा मानांच्या पालख्यांचे विश्वस्त, सोहळा प्रमुख ऑनलाइनद्वारे बैठकीस हजर होते. आषाढीयात्रेला येणाऱ्या पालखी सोहळ्यासोबत दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत आहे.

त्यांना पालखी मार्ग व तळांवर कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन अधिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. पालखी मार्गावर सोहळ्यांसाठी वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये यासाठी स्वतंत्र वाहतूक अधिकऱ्यांची नेमणूक करण्यात येईल. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या बैलजोड्यांना चारा, पाणी, वॉटरप्रूफ तंबू याचीही सोय करण्यात येईल.

#### माऊलींच्या पालखी तळाच्या विस्तारीकरणाचे काम सुरु

आषाढी यात्रा सोहळा पावसाळ्यात येत असल्याने भाविकांच्या सुविधेसाठी वॉटरप्रूफ मंडपांची संख्या वाढविण्यात येईल. राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात पालखी सोहळ्यांना अडचणी निर्माण झाल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्या अडचणी सोडवल्या जातील. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादनाचे काम सुरू केले आहे. तसेच यंदाचा आषाढी यात्रा सोहळा सर्वांच्या सहकार्याने अधिक चांगला कसा होईल, या दृष्टीने नियोजन करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.

#### पालखी सोहळाप्रमुखांच्या मागण्या

यावेळी दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुखांनी पालखी मार्ग तसेच पालखीतळाच्या ठिकाणी विविध सुविधांबाबत मागणी केली. यामध्ये मोबाईल टॉयलेटची संख्या वाढवावी, पालखी सोहळ्याच्या ठिकाणा पासून रुग्णवाहिका सोबत असावी, पालखी मार्गावर वॉटरप्रूफ मंडपांची संख्या वाढवावी, पालखी मुक्कामाच्या शाळा, कॉलेज, समाज मंदिर या ठिकाणी व्यवस्था व्हावी मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छताव अखंडित वीजपुरवठा व पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा करावा. पालखी तळांसाठी वाढीव जागा मिळावी. मुख्य रस्त्यापासून पालखी सोहळे मुक्कामाच्या ठिकाणी जाताना रस्ते अरुंद असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी होते ते रस्ते रुंद करून मिळावेत.पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांचा इन्शुरन्स करावा अशा विविध मागण्या सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी केल्या.

## निधन वृत्त...

### सरोजनी अलवाल

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

सरोजनी राजाराम अलवाल यांचे सोमवार २७ एप्रिल रोजी दुपारी २.४५ वा. दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात ६ मुली १ मुलगा २ सुना व इतर नातू नातवंडे आहेत. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.



### सिध्देश्वर तोडकरी

**मोडनिंब (ता. माढा), दि. २७ एप्रिल-**

येथील सिद्धेश्वर (आप्पा) अण्णा तोडकरी वाणी (वय ७५) यांचे सोमवारी सकाळी अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, दोन सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.



### श्रीकांत कालाणी

**सोलापूर दि. २७ एप्रिल-**

सम्राट चौक येथील महेश सोसायटीतील श्रीकांत श्रीलाल कालाणी (वय ७५) यांचे सोमवार २७ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता अल्पशा आजाराणे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ मुली, ३ बहिणी, नातु-नातवंडे असा परिवार आहे. त्याची अंत्ययात्रा मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरातून निघणार आहे. ते सुयोग कालाणी यांचे वडील होत.



# भाजपाच्या विजयी मेळावा व कृतज्ञता सोहळ्याची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल -**

भारतीय जनता पार्टीतर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंगळवारी दुपारी १२ वाजता होणाऱ्या विजयी मेळावा व कृतज्ञता सोहळ्याची जय्यत तयारी केली असून, सोमवारी सायंकाळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, महापालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी पोलीस प्रशासनासमवेत सभेच्या स्थळाची पाहणी केली.

यावेळी पोलीस उपायुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, पोलीस उपायुक्त गौहर हसन, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिरडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त पंडित, सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर उपस्थित होते.

आमदार देवेंद्र कोठे याप्रसंगी म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरकरांना दिलेल्या शब्दानुसार दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी १,३७८ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे. अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहत आणि होटगी रोड औद्योगिक वसाहतीसाठी ५६ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

सोलापूरकरांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असलेल्या आयटी पार्क आणि सोलापूरच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विषयदेखील मार्गी लागला आहे. उजनी धरण येथे फ्लोटिंग सोलार पी व्ही बॅटरी ऊर्जा साठवण प्रणाली व शाश्वत एआय कॅम्पसकरिता तब्बल एक लाख २८ हजार ८८३ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा करार झाला आहे. सोलापूरकरांच्या विकासाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सोलापूर महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच नगरपालिका निवडणुकीत सोलापूरकरांनी भाजपाला भरभरून मतदान केले आहे.

निवडणुकीत भाजपाला दिलेल्या यशाबद्दल सोलापूर शहर जिल्ह्यातील मतदारांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या सत्कारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापुरात येत आहेत.

#### भाजपाच्या यशाचे कौतुक

भारतीय जनता पार्टीला सोलापूर महानगरपालिकेसह जिल्हा परिषद नगरपालिका निवडणुकांमध्येही मिळालेल्या भरघोस यशाचे कौतुक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार आहेत. या सोहळ्यात शहरवासीयांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

**- विनायक कोंड्याल, महापौर, सोलापूर**

### आमदार कोठे यांनी पोलिस प्रशासनासमवेत केली पाहणी



#### विकासाच्या सोहळ्याचे होऊया साक्षीदार

सोलापूर शहर-जिल्ह्याचा सर्वांगीण विकास मोठ्या प्रमाणावर होत असताना या विकासाच्या सोहळ्याचे साक्षीदार होण्याची संधी सोलापूरकरांना मिळाली आहे. त्यामुळे मंगळवारी होणाऱ्या विजयी मेळावा व कृतज्ञता सोहळ्यासाठी भाजपाच्या सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि शहर-जिल्हावासियांनी उपस्थित रहावे आणि विकासाच्या सोहळ्याच्या साक्षीदार व्हावे.

**- देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

#### मुख्यमंत्र्यांच्या सभेसाठी अशी असेल व्यवस्था

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंगळवारी होणाऱ्या सभेसाठी १०० बाय ३०० फुटांचे तीन भव्य मंडप उभारण्यात आले आहेत. तर सभेचे व्यासपीठ ४० बाय ६० फुटांचे व्यासपीठ असणार आहे. २० हजार जणांना बसण्याकरिता खुर्च्या ठेवण्यात आल्या आहेत. तसेच ५०० सोफे देखील ठेवण्यात आले आहेत.

#### मुख्यमंत्र्यांकडून सभेसाठी विशेष सूचना

सभेला येणाऱ्या सोलापूरकरांना उन्हाचा त्रास होऊ नये याकरिता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. त्यानुसार नागरिकांचा उन्हापासून बचाव करण्यासाठी १०० मोठे कुलर लावण्यात आले आहेत. तसेच ४ टनाची ६ वातानुकूलित यंत्रणा उभारण्यात आली आहे. सभास्थळी येणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली असून, खबरदारीचा उपाय म्हणून सभेस्थळी रुग्णवाहिका तसेच डॉक्टरांचे पथकही राहणार आहे, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.



# श्री भगवंत प्रकटोत्सव दिन विशेष



# भक्त अंबरीष चरित्र व श्री भगवंताची महती



ज्याला घडली नाही काशी त्याने जावे बार्शी भगवंताच्या चरणापासी सखा नांदे अंबऋषी- प्रतिवर्षी वैशाख शुद्ध द्वादशी दिवशी आपण श्री भगवंताचा प्रगटदिन साजरा करीत असतो. वैशाख शुद्ध द्वादशीला ऋषी दुर्वासाचे सत्व हरण करण्यासाठी श्री विष्णूना प्रगट व्हावे लागले.

राजा अंबरीष हे मूळचे उत्तरेकडचे आहेत. ते एक सूर्यवंशी राजा होत.

नाभागादम्बरीषोऽ भून्महाभागवता कृती ।
नास्पृशद् ब्रम्हशापोऽपि यं न प्रतिहतः क्वचित्

मनु पुत्र नभग नभगाचा मुलगा नाभाग आणि नाभागाचा मुलगा अंबरीष हे भगवंताचे मोठे भक्त होते. उदार हात ब्रह्मशाप कधी खोटा ठरत नाही. तो ब्रह्मशाप अंबरीष राजाला स्पर्श ही करु शकला नाही. राजा अंबरीष हे भाग्यवान होते.

अंबरीषो महाभागः सप्तद्वीपवर्ती महीम् ।
अव्ययांच श्रियंलब्ध्वा विभवं चातुनं भुवि।।

पृथ्वीच्या सात द्विपावर त्यांची स्थिर संपत्ती होती. अतुलनीय ऐश्वर्य त्यांच्यापाशी होते. पण हे ऐश्वर्य साधारण व्यक्तीसाठी दुर्लभ आहे. पण राजा अंबरीष याला स्वप्नतुल्य समजायाचे. कारण ते ओळखून होते की, या धनाच्या लोभाने मनुष्य घोर नरकात पडतो. ही केळव चार दिवसांची चांदणी आहे. अंबरीषाचे श्री विष्णूवर व साधूंवर फार प्रेम होते. विष्णूच्या भक्तीमुळे त्यांना ही संपत्ती मातीप्रमाणे भासत होती.

स वै मनः विष्णूपदारविन्दयो र्वचांसि वैकुंठ गुणानुवर्णने ।
करौ हरर्मान्दिरमार्जनादिष श्रुति चकाराच्युतसंत्कथोद ये ।।

त्यांनी आपले मन श्री विष्णूंच्या चरणावर वाहिले होते. वाणी भगवंताचे गुण गाण्यासाठी हात भगवंताचे मंदीर मार्जन करण्यासाठी, कान श्री भगवंताची कथा ऐकण्यासाठी, डोळे भगवंताच्या दर्शनासाठी, नाक भगवंताच्या पायावर वाहिलेल्या तुळशी दलाचा सुगंध घेण्यासाठी.

नंतर अंबरीष राजाची भक्ती एवढी वाढली की, त्यांना हे राज्य हे वैभव, ही संपत्ती नको नकोशी वाटू लागली. संसार हा दुःखमय आहे हे त्यांना जाणवू लागले. खरे सुख हे भगवंताच्या नामस्मरणामध्ये आहे हे त्यांना समजू लागले. भगवंताचे नाम हे अमृत आहे असे त्यांना वाटू लागले. त्यांना विषयाचा कंटाळा येवू लागला, संसारात मन रमेना.

अमृत है हरी नाम जगत मे,
उसे छोड विषय विष पिना क्या
हरी नाम नही तो जीना क्या

त्यांना कळाले की हरी नाम हे सर्वात श्रेष्ठ आहे. त्याच्याशिवाय आपण आता जगूच शकत नाही. काळाचा घाला आपल्यावर केव्हा येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आपण भगवंताचे नाव सतत घेतले पाहिजे असे त्यांना वाटे.

या संपत्तीनी आपण कितीही अंग सजवले पण जिभेवर जर भगवंताचे नाव ओ नाही तर त्याचा काय उपयोग. मरणानंतर देह इथेच राहणार आहे. तेव्हा या दागिन्याचा, संपत्तीचा काहीही उपयोग नाही. तेव्हा आपण आता संपत्तीचा त्याग करावा. ही संपत्ती माझ्या भगवंताच्या नामस्मरणाला आडकाठी ठरत आहे असे समजून भक्तराज अंबरीषाने भगवंताची प्राप्ती व्हावी म्हणून राज्याचा त्याग केला व रानीवनी भगवंताचे स्मरण करीत आपले जीवन जगू लागले.

भगवंताच्या नामस्मरणाने आनंदाचे डोही आनंद तरंग आनंदची अंग आनंदाचे अशी त्यांची स्थिती झाली. भक्तराज अंबरीष तहान भूक विसरुन गेले का नाही जाणार भगवंताचे नामच एवढे सुखकारक आहे म्हणतात ना माणसाचे पुण्य जास्त झाले म्हणजे त्यांना सद्गुरु भेटतात.

पूर्वी अपल्या बार्शीला निरनिराळी नावे होती. पंकजमुनींचा वास येथे अभयारण्यात होता म्हणून पंकापूर म्णायचे. साधारणतः भक्तराज अंबरीष बार्शीपासून ३० किलोमीटर म्हणजेच आजची कुर्डुवाडीपर्यंत आल्यावर त्यांना भगवंताचे नामस्मरण करीत कोणीतरी महान ऋषी आपल्याकडे येत आहेत असे अंबरीषाला दिसले. त्यांचे तेज भव्य होते. भक्त अंबरीषांचे त्यांच्या तेजाने डोळे दिपू लागले. नारायणाचा गजर करीत नारद अंबरीष राजाच्या पुढ्यात येवून उभे राहिले. अंबरीषाने त्यांना साष्टांग दंडवत घातले.

नारदाने राजा अंबरीषाला छातीशी कवटाळले. दोन महान भगवंत भक्तांची भेट झाली. हा सोहळा पाहण्यासाठी आकाशत देवाची गर्दी झाली. नारदांनी अंबरीषाला साधन द्वादशी करण्याचा सल्ला दिला. सादन द्वादशी केल्यानंतर तुला भगवंत प्राप्ती होईल, असे सांगितले. दशमीला एकवेळ जेवण, एकादशी निरहार एकादशी दिवशी रात्री हरीजागर व सकाळी सूर्योदयापूर्वी भोजन असे हे व्रत आहे. येथून जवळच अभयारण्य आहे. तिथे एक नदी आहे. त्या नदीच्या पात्रात उभे राहून भगवंताचे हे मी सांगितलेले व्रत आचरण कर असे सांगून मुनीश्रेष्ठ नारद निघून गेले.

नंतर राजा अंबरीष अभयारण्यात आले आणि त्यांनी साधना द्वादशीचे व्रत अवलंबिले.'पुण्य होतसे श्रवणे करीता मने शुद्ध ऐसी व्रत हे असे द्वादशी'.

साधन द्वादशीच्या व्रतामुळे राजा अंबरीषाचे पुण्य वाढू लागले. त्यांची किर्ती वाढू लागली. त्रिलोकामध्ये राजा अंबरीषाच्या साधन द्वादशीचा डंका वाजू लागला. ही गोष्ट राजा इंद्राच्या कानावर गेली. राजा अंबरीषाचे पुण्य जर अधिक वाढले तर त्याच्या पुण्याच्या प्रभावाने आपले इंद्रपद जाऊ शकते. ही चिंता त्याला रात्रंदिवस वाटू लागली.

'लागली चिंता इंद्राला, पदाची दिन अन् रातीला'

त्याला झोप येईना. आपले पद गेल्यावर आपल्याला कोण विचारणार नाही याची त्याला चिंता लागून राहिली. काय करावे हे त्याला सुचेना. पण त्याला माहीत नव्हते की राजा अंबरीषांनी आपल्या राज्याचा भगवंताच्या दर्शनासाठी त्याग केला आहे.

मेघाच्या गर्जनेने खवळून वरती सिंह पाहे स्वभावे काका त्वा भितीसारी तरुन त्यजा वरी मौस खंडासी झाला. जो उन्मत गजांच्या फोडून मस्तकाने झाला. रक्त पिऊनी मृतनच पशुच्या इच्छितो तो कनाते.मेघ गर्जना झाल्यावर सिंह खवळून वर पहातो पण झाडावरच्या कावळ्याला वाटते की, माझ्या तोंडात जो मासाचा तुकडा आहे त्याला पाहून सिंह गर्जना करतो आहे. पण त्या कावळ्याला माहीत नाही की, मदमस्त झालेल्या हत्तीचे गंडस्थळ फोडून खाणारा सिंह तुझ्या एवढ्याशा मासाच्या तुकड्यासाठी कशासाठी डरकाळी फोडेल.

त्याप्रमाणे इंद्राला माहीत नव्हते की, हरीनामाचे अमृत पिणारा राजा अंबरीष तुझ्या सिंहसनाची कशाला अपेक्षा करेल.

एवढ्यात दुर्वास मुनी येताना राजा इंद्रला दिसले. इंद्राला फार आनंद झाला. त्यांनी दुर्वास मुनींचा सत्कार केला. त्यांची पूजा केली व त्यांना संतुष्ट केले. इंद्राने अंबरीष राजा माझ्या पदासाठी साधन द्वादशीचे व्रत करीत आहे असे खोटे सांगून त्या त्यांच्या व्रताचा भंग करण्यासाठी पाठविले. दुर्वास मुनी एकाशीच्या रात्री राजा अंबरीषाकडे आले. राजा अंबरीषाला फार आनंद झाला. त्यांनी त्यांची पूजा केली. वरवरुन आनंद दाखवीत दुर्वास मुनी म्हणाले, मी स्नानाला जावून येतो तू माझी वाट पहा. मी आल्याशिवाय व्रत सोडू नको, असे म्हणून दुर्वास मुनी स्नानाला गेले. पण सूर्योदयाची वेळ होवू लागली तरी दुर्वास मुनी येईनात. तेव्हा राजांनी साधू संतांना विचारुन पाणी ग्रहण करुन व्रत सोडले.

तेव्हा दुर्वास मुनी तेथे आले. ते क्रोधीत झाले होते. तू माझा अपमान केला आहे, असे म्हणून त्यांनी जटेतील एक केस उपटून एक राक्षसी तयार केली. ती राक्षसी राजा अंबरीषाकडे येवू लागली.

हरी तैसे हरीचे दास, नाही तया मोह चिंता आस

राजा अंबरीष अजिबात घाबरले नाहीत. त्यांनी श्रीहरीचे स्मरण करताच भक्तांचा कनवाळू भगवान यांनी भक्ताच्या रक्षणासाठी सुदर्शन सोडले. राक्षसीचा वध झाला. ते चक्र दुर्वासाच्या मागे लागले. ते ब्रह्मदेवाकडे गेले. ब्रह्मदेव म्हणाले, श्रीशंकराकडे जा, ते श्रीशंकराकडे आले. श्रीशंकर म्हणाले चक्र श्रीभगवंताचे आहे. त्यांच्याकडे जा, ते दमले पण नाईलाज होता धावत धावत ते विष्णूकडे आले. श्री विष्णू म्हणालेल चक्र आता माझ्या भक्ताच्या ताब्यात आहे. तेव्हा भक्ताकडे जा. गर्वहरण झाले होते. भगवंताच्या भक्ताला जो त्रास देतो त्याची अशी अवस्था होते.

जो अपराध भगवत कर करई । राम शेष पावक सो जरई ।
लोकड बंद बिदित इतिहासा । यह महिमा जानाहे दुरबासा ।

नंतर दुर्वास अंबरीषाला शरण आले. अंबरीषाने चक्र शांत केले. तिथे एक खड्डा पडला ते उत्तरेश्वर मंदिरासमोर तीर्थ झाले. त्याला गुप्तचक्र तीर्थ म्हणतात. नंतर दुर्वासाने भगवंताचया दर्शनाची इच्छा प्रगट केली. तेव्हा राजा अंबरीषाने भगवंताची प्रार्थना केली. श्रीभगवंत प्रगट झाले. ज्या दिवशी प्रगट झाले तो दिवस बार्शीकरांच्या भाग्याचा म्हणजे वैशाख शुद्ध द्वादशी. अशा त्या भगवंताला माझा नमस्कार असो. हे भगवंत माझ्या बार्शीकरांना सुखी ठेव, तुझा आशीर्वाद सतत आमच्यावर राहू दे. द्वादशीला बारस म्हणतात. त्यावरुन आपल्या शहराला बार्शी हे नाव पडले. तसेच १२ तीर्थ व १२ लिंग या गावामध्ये आहे म्हणून सुद्धा याला बार्शी हे नाव पडले. असो पुन्हा एकदा श्रीभगवंत चरणी नतमस्तक होतो. श्रीभगवंताची श्री. बडवे मंडळी नित्य पूजा करतात. पंच मंडळी चांगल्या प्रकारे मंदिराचे पालन करतात. तसेच मा.आ. राजाभाऊ राऊत हे भगवंताचे परम भक्त असल्यामुळे श्री भगवंताचा प्रगट उत्सव ते हिरीरीने भाग घेवून करतात. आपणा सर्व बार्शीकरांचे श्रीभगवंतावर अतोनात प्रेम आहे ते असेच राहू दे. बार्शी म्हणजे भगवंत व भगवंत म्हणजे बार्शी हे समीकरण झाले आहे. श्री भगवंताचे दर्शन घेतल्याशिवाय आमचा दिवस जात नाही हेच खरे.

ह.भ.प. सुनील बडवे, बार्शी
शब्दांकन-अरुण बळप,बार्शी.





श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास व भक्तांस हार्दिक शुभेच्छा

स्वप्न कोणतेही असो, ते पूर्ण करण्यासाठी कोणाची तरी साथ हवी असते आणि ती मिळाल्याशिवाय स्वप्न पुर्ण होत नाहीत. अशीच आपणास आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही 'स्नेहश्री मल्टीस्टेट'ची साथ देण्यासाठी तत्पर आहोत. सभासदांना बचतीची सवय लावणे व त्यातून त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.

| ठेवींवरील आकर्षक व्याज | |
|---|---|
| ४६ दिवस ते ३ महिने | ०९% |
| ०४ महिने ते ६ महिने | १०% |
| ०७ महिने ते १२ महिने | १२% |
| १३ महिने ते २४ महिने | १२.५% |
| २५ महिने ते पुढील कालावधींसाठी | १२% |
| ज्येष्ठ नागरिक | १% जास्त |

स्नेहश्री मल्टीस्टेट
को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पुणे
Reg. No. MSCS/CR/1241/2015
शाखा : बार्शी, मिरगणे कॉम्प्लेक्स, तेल गिरणी चौक, बार्शी, ता. बार्शी
जि. सोलापूर फोन :- ०२१८४-२२२२२५



श्री भगवंत प्रकटोत्सव दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !





।। शुभेच्छुक ।।
श्री. नंदकुमार मुरलीधर बडवे
श्री. मनोज मुरलीधर बडवे
भगवंत देवस्थान बडवे समिती, बार्शी.
भगवंत देवस्थान दागिणे व्यवस्थापन समिती, बार्शी.


# बार्शीचा भगवंत महोत्सवः एक ऐतिहासिक आरंभ



श्री भगवंत महोत्सवाचे प्रवर्तक तथा पहिले शिलेदार मा. आमदार राजाभाऊ राऊत, कै. श्रीकांत (आण्णा) पिसे, ॲड. प्रशांत शेटे, कै. डॉ. डी. जी. कश्यपी, कलाकार राजा शिंदे, दशरथ मोहिते सर (सन २००२)

बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत! जगातील एकमेव असे मंदिर जिथे भगवान विष्णू 'भगवंत' रूपात विराजमान आहेत. अनेक वर्षे हा उत्सव मंदिरात पारंपारिक पद्धतीने साजरा होत होता, पण २००२ मध्ये काही ध्येयवेड्या माणसांच्या मनात एक विचार आला- हा उत्सव केवळ मंदिराचा न राहता संपूर्ण बार्शीचा 'लोकसोहळा' झाला पाहिजे.

**नेतृत्वाचे भक्कम 'आधारस्तंभ'**

या मोहिमेचे पहिले आधारस्तंभ ठरले माजी आमदार राजाभाऊ राऊत. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती आणि बार्शीला वेगळी ओळख देण्याची जिद्द होती. त्यांना साथ मिळाली ती दिवंगत नगराध्यक्ष श्रीकांत अण्णा पिसे यांची. अण्णांनी नगरपरिषदेची सर्व यंत्रणा या कार्यासाठी उभी केली. तर, आध्यात्मिक आणि नियोजनाची बाजू सांभाळली श्री भगवंत देवस्थान ट्रस्टचे तत्कालीन सरपंच दिवंगत डॉ. अण्णासाहेब कश्यपी यांनी. या तिघांच्या त्रिवेणी संगमातून महोत्सवाची पायाभरणी झाली.

**नियोजनाची धुरा आणि कल्पकता**

या मोठ्या स्वप्नाला वास्तवात उतरवण्यासाठी ॲड. प्रशांत शेटे यांनी समन्वयाची भूमिका बजावली. पण हा सोहळा डोळ्यांचे पारणे फेडणारा हवा होता. त्यासाठी कल्पक दृष्टी दिली ती कलाकार राजा शिंदे आणि दशरथ मोहिते सर यांनी. रांगोळी, सजावट आणि सादरीकरण यांतून त्यांनी बार्शीला एका नव्या रूपाची ओळख करून दिली.

**बार्शीकरांचे भाग्यः वाखरीची अनुभूती बार्शीत!**

या महोत्सवाचे सर्वात मोठे आकर्षण आणि वेगळेपण म्हणजे वारीतील भक्तीचा उत्साह शहरात आणणे. पंढरपूर वारीतील वाखरीप्रमाणेच 'अश्व रिंगण सोहळा' आणि 'चक्री भजन' हे पहिल्यांदाच बार्शीकरांना आपल्या दारात अनुभवण्याचे भाग्य लाभले. या अभूतपूर्व सोहळ्याने बार्शीकरांची मने जिंकली आणि महोत्सवाचा दर्जा एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला.

**जेव्हा बार्शी भक्तीरंगात न्हाऊन निघाली**

नगरपरिषदेच्या संपूर्ण टीमने अहोरात्र मेहनत घेतली. बघता बघता, हा उत्सव केवळ धार्मिक राहिला नाही. रस्त्या-रस्त्यावर रांगोळ्या उमटल्या, घराघरांवर गुढ्या उभारल्या गेल्या आणि हजारो बार्शीकर या 'प्रकटोत्सव सोहळ्यात' मोठ्या लोकसहभागातून सामील झाले. पहिल्यांदाच बार्शीने अनुभवले की, जेव्हा लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि कलाकार एकत्र येतात, तेव्हा एक 'सार्वजनिक सोहळा' कसा इतिहास घडवू शकतो.

आज श्री भगवंत महोत्सव जो वटवृक्ष झाला आहे, त्याची बीजे २००२ मध्ये राजाभाऊ राऊत, श्रीकांत अण्णा पिसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पेरली होती.

त्या पहिल्या टीमच्या सांघिक प्रयत्नांमुळेच आज बार्शीची ही परंपरा सातासमुद्रापार पोहोचली आहे.


आगतम् ! स्वागतम् !! सुस्वागतम् !!!
महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री




मा. ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब
यांचे बार्शीचे ग्रामदैवत
श्री भगवंत नगरीत सहर्ष स्वागत !



तसेच भगवंत प्रकट दिनाच्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक : श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट बार्शी, जि. सोलापूर


# भगवंत महोत्सवात सहाव्या दिवशी स्थानिक कलाकारांनी आपल्या कलेचे रंग उधळले

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि. २७ एप्रिल

श्री भगवंत महोत्सव २०२६ निमित्त सहाव्या दिवशी आयोजित कार्यक्रमात स्थानिक कलाकारांनी आपल्या विविधांगी कलेचे अप्रतिम सादरीकरण करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. नृत्य, गायन, नाटक, वादन अशा विविध कलाप्रकारांनी कार्यक्रम रंगतदार झाला.

कार्यक्रमास भगवंत महोत्सवाचे संकल्पक मा.आमदार राजेंद्र राऊत, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक यावलकर, प्रांताधिकारी पडदुणे, शिक्षणाधिकारी सचिन जगताप तहसीलदार आर. एफ. शेख, डॉ. बी. वाय. यादव, बाजार समिती चेअरमन विजय गरड, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, पंचायत समिती सभापती रोंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी राजाभाऊ राऊत यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महापुजेसाठी येणार असून त्या दौऱ्याच्या पाहणीसाठी अधिकारी आले होते. विनंती करताच त्यांनी कार्यक्रमालाही उपस्थिती दर्शवली. गेली नऊ वर्षे भगवंत महोत्सव साजरा करण्यात येत असून, विष्णूचा मूळ अवतार असलेले भगवंत हे जगातील एकमेव मंदिर आहे. त्यानंतर विष्णूचे दशावतार झाले.

बार्शी तालुक्यास फडणवीस यांच्या माध्यमातून सुमारे ५ हजार कोटींचा निधी मिळाला असून तीर्थक्षेत्र आराखड्यासाठी सर्व अटी पूर्ण करण्याचे काम सुरु आहे.




तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असून भविष्यात दरवर्षी शासकीय महापूजा व्हावी, ही आमची मागणी आहे. तसेच युवा अधिकाऱ्यांनी भगवंत तीर्थक्षेत्रासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ओंकार एकशिंगे व परिवार यांच्यावतीने दीड किलो वजनाच्या चांदीच्या पादुका अर्पण करण्यात आल्या. कृषी उत्पन्न बाजार समितीने दहा लाख रुपयांचा धनादेश समितीला दिला.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बार्शीकरांचे अभिनंदन करताना सांगितले की, राजाभाऊ राऊत यांनी आग्रहाने सन्मान करुन येथे बोलावले. मुख्यमंत्री दौऱ्याचे नियोजन बार्शीतील टीम व संयोजकांनी अत्यंत योग्य प्रकारे केले आहे.

कार्यक्रमात कृपिका शिंदे, शंकर वाघमारे, मयंक जेगावकर, शिवाजी महाविद्यालय, गायत्री जेवरे, मृणाली सातव, नैना राजगुरु, दिगंबर जानराव, वैशाली जानराव, शारदेय डान्स अकॅडमी, जुनून डान्स अकॅडमी, रितिकांत हामने, सायली दराडे, जयभीम शिंदे, बी-युनिक डान्स अकॅडमी, प्रगीता वाळके, निहाल शेख, भगवंत कला सृष्टी, संतोष कांबळे आदींसह अनेक कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.

ग्रुप डान्स, रिमिक्स डान्स, लोकनृत्य, लावणी, हिंदी व मराठी गीते, भक्तिगीते, एकांकिका, ऐतिहासिक नाटके, ऑर्केस्ट्रा व वादन अशा विविध सादरीकरणांनी प्रेक्षकांची मने जिंकली. शाहरुख थीम, त्रिपुरा लोकनृत्य, छावा थीम, ऑपरेशन सिंदूर ग्रुप डान्स, वेस्टर्न रिमिक्स, आदिवासी नृत्य यांना विशेष प्रतिसाद मिळाला.

बार्शी नगरपालिका मुख्याधिकारी तैमूर मुलानी यांनी मैं शायर तो नहीं मगर जबसे देखा मैंने तुझको हे गाणे सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आसावरी फारताडे, संदीप अफाट व धीरज शेळके यांनी केले.


श्री भगवंत प्रकटोत्सव दिनास हार्दिक शुभेच्छा !





सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड व प्रिसीजन प्रिंटर्स तर्फे
भगवंत-लक्ष्मी चरणी विनम्र अभिवादन !

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१४२५

**मग वाड धाकुटें न म्हणती । सजीव निर्जीव नेणती ।**
**देखिलिये वस्तू उजू लुंटिती । मीचि म्हणोनि ।।**

अविवेकी लोक कसे असतात आणि कसे वागतात याचे स्पष्टीकरण झाल्यानंतर आता भगवंत ज्ञानी, विवेकी व्यक्तिबद्यल बोलत आहेत. विवेकी लोक निर्मळ मनाचे असतात. सतप्रवृत्तीत, सद्भावनेत ते जगत असतात. यांच्या सर्व इंद्रियांनी संयमाचे अलंकार पांघरलेले असतात. यांचे मन, इंद्रिय पूर्णत: त्यांच्या स्वाधीन असतात. आपल्या सदवर्तनातून ते पाप नांवाचा प्रकार शिल्लक ठेवत नाहीत. जगाची दु:खे नाहिशी करुन ते सर्व विश्व आनंदाने भरण्याचा प्रयत्न करतात. ज्ञानदानाच्या माध्यमातून ते जगाला जीवन देतात.



अमृतावाचून ते अमर करतात, योगाभ्यासाशिवाय लोकांना आत्मसुखात नेऊन पोहचवतात. राजा आणि रंक, लहान-मोठा यांत ते भेद करीत नाहीत. सुर्य तेज:पुंज असला तरी तो मावळतो, चंद्र एखादयाच दिवशी पूर्ण असतो. पण हे लोक कधीच मावळत नाहीत, तसेच ते सदैव परिपुर्ण असतात. या लोकांना आदिब्रम्हापासून ते चिलटापर्यन्त सर्व जीव समान वाटतात. प्रत्येकात ते ईश्वराचा अंश पाहतात. त्यांची दृष्टी कशी सम असते. याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले,

**मग वाड धाकुटें न म्हणती । सजीव निर्जीव नेणती ।**
**देखिलिये वस्तू उजू लुंटिती । मीचि म्हणोनि ।।**

अर्थात, हा जीव छोटा आहे आणि हा जीव मोठा आहे असे तर मानतच नाहीत. पण हे विवेकी लोक सजीव, निर्जिव असा भेद देखील पाहात नाहीत. त्यांच्या डोळयांना दिसणारी प्रत्येक वस्तु त्यांच्यासाठी ईश्वरीय अंश झालेली असते. त्यामुळे त्यांच्या हातून अयोग्य घडण्याचे कारणच नाही. अशी सर्वत्र सदा सम पाहणारी विवेकी माणसेच सर्वांना आवडणारी असतात असेही भगवंत म्हणाले. सर्वत्र सम पाहण्याची आज फार मोठी गरज आहे. माणूस लहान-मोठा, श्रीमंत-गरीब, अशा वेगवेगळया प्रकारांनी विभागला गेला आहे. आप-पर हा भाव, भेद फार वाढत चालला आहे. त्यामुळे अशा समदृष्टी लोकांची गरज निर्माण झाली आहे. आपण निर्जिवात एकेश्वराला पाहावे अथवा न पाहावे, पण किमान सजिवात तरी एकेश्वराला पाहून समता निर्माण करणे आवश्यक आहे. फळांनी लगडलेल्या फांदया जसे लिनतेने खाली वाकतात, तसे समदृष्टीचे लोक नम्रपणे सर्वाबरोबर सारखे वागतात. नम्रता हीच यांची खरी संपती असते. जो नम्र झाला भूतां । त्याने कोंडिले अनंता ।।, म्हटल्याप्रमाणे प्राणीमात्राशी जो नम्रपणे वागतो तो भगवंताला आपल्या हदयात कोंडून ठेवू शकतो. अहंकार, मी पणा निघून गेला म्हणजे नम्रता प्रवेश करते. नम्रता आली म्हणजे आपुलकी, प्रेम आपोआप जवळ येतात. ज्याच्याजवळ आपुलकी, प्रेम असते त्याला शत्रु असण्याचे कारणच नाही. अर्थात, सर्वच ज्याला मित्र असतात, त्याला दु:ख,चिंता होण्याचे कारणच नसते. आपणही श्रीकृष्ण भगवंतांनी विवेकी, ज्ञानी व्यक्तीबद्यलच्या सांगीतलेल्या गुणा प्रमाणे गुणी होऊन विवेकी, ज्ञानी बनण्याचा प्रयत्न करायला हवा. मीपणा पेक्षा आम्हीपणा किंवा अभिमानापेक्षा नम्रता कधीही चांगली असते याची प्रचिती आपण प्रत्यक्ष वर्तन केल्यानंतरच लक्षात येईल. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. २८ एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- उ.फाल्गुनी (२२.३५)**
**योग - व्याघ्यात (२१.०३)**
**करण - वय (०६.३०)**
**राहू काल : मंगळवार**
**दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष :**
**२००१: डेनिस टिटो हे पैसे देऊन अंतराळात जाणारे पहिले अंतराळ पर्यटक बनले**
**२००३: ॲपल कम्प्यूटर इन्क. ने आयट्यून्स स्टोअर सुरू केले**
**१९३२: पिवळ्या तापाची लस मानवी वापरासाठी जाहीर**
**१९६९: फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स गॉल यांनी राजीनामा दिला**

## श्रीकृष्णा रायरा मठातर्फे २ मे रोजी श्री श्रीनिवासा कल्याण महोत्सव



### दिवसभर धार्मिक विधी पार पडणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**
शहरातील श्री कृष्णा रायरा मठातर्फे शनिवार दि. २ मे रोजी श्री श्रीनिवासा कल्याण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा कर्णिक नगर परिसरातील जुन्या वालचंद कॉलेजजवळील चिल्ड्रन पार्क शेजारील मैदानावर पार पडणार असल्याची माहिती पुरुषोत्तम धूत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मठाचे प्रमुख श्री श्री श्री स्वामी कमलनाथ प्रसादा यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाची सुरुवात पहाटे ५ वाजता पुण्याहवाचनाने होणार असून रात्री १० वाजेपर्यंत विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. श्री श्रीमुष्णम राघवेंद्र आचार्य व त्यांच्या सहकाऱ्यांच्या हस्ते वेदमंत्रांच्या घोषात सर्व विधी संपन्न होतील. 'श्री श्रीनिवासा कल्याण महोत्सव' हा भगवान वेंकटेश्वर आणि देवी पद्मावती यांच्या प्रतीकात्मक विवाह सोहळ्याचे दर्शन घडवणारा एक पवित्र उत्सव आहे. या उत्सवात वरपूजा, कन्यादान, मंगलसूत्र बांधणे, अक्षता, आरती व प्रसाद वितरण यांसह तैलाभ्यंजन, महापंचामृत पूजा, नीजपाद दर्शन, तोमाला सेवा असे विविध विधी पार पडणार आहेत.या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी नंदकिशोर रामकिशन धूत (एन.आर. ग्रुप) आणि डॉ. सूर्यप्रकाश कोठे हे विशेष सेवा कर्ते म्हणून कार्यरत आहेत. तसेच माजी सभागृह नेते श्रीनिवास करली, खजिनदार लक्ष्मण करली व त्यांच्या मित्रपरिवाराच्या पुढाकारातून हा सोहळा सोलापुरात आयोजित करण्यात येत आहे. सल्लागार समितीत गौतम संचेती यांचा सहभाग आहे, असे पुरुषोत्तम धूत यांनी सांगितले. महोत्सवात अधिकाधिक भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन उत्सवाचे अध्यक्ष शिवशंकर अंजनाळकर, उपाध्यक्ष नरेश बोल्लू, मंदार कुलकर्णी व लक्ष्मण करली यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस श्रीनिवास करली, व्यंकटेश चिल्का, डॉ. हिरालाल अग्रवाल उपस्थित होते.

# 'जलजीवन मिशन'च्या ६०० पेक्षा जास्त कामांना ब्रेक

- कार्यारंभ आदेश मिळाले तरी बिलाची हमी नाही; कंत्राटदार जोखीम घेण्यास अनुत्सुक
- आर्थिक अधिकारांच्या अडचणीत जिल्ह्यातील कोटींची विकासकामे ठप्प?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल -**
जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर १ हजार पाणीपुरवठा योजनांपैकी ६०० हून अधिक कामे निधीअभावी थांबल्या आहेत. पाणीटंचाईग्रस्त भागांसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या या योजना कागदावरच राहिल्या आहेत. कंत्राटदार संघटनांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कार्यारंभ आदेश मिळाले असले तरी बिलाची हमी नसल्याने आर्थिक जोखीम घेऊन कामे सुरू करणे शक्य नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने या विषयावर राज्य शासनाकडे मार्गदर्शक सूचना मागवल्या असून, लवकरच निर्णय होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. मात्र निर्णयास विलंब होत राहिल्यास सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण विकास आणखी मागे पडण्याची भीती व्यक्त होत आहे.

ग्रामीण विकासाला गती देण्याच्या घोषणा होत असतानाच सोलापूर जिल्ह्यातील तब्बल ३०० कोटी रुपयांची विकासकामे प्रशासकीय पेचात अडकली आहेत. जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ७५० हून अधिक ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमले आहेत, मात्र त्यांना आर्थिक अधिकार न दिल्याने अनेक विकासकामे रखडली आहेत. परिणामी ग्रामीण भागातील रस्ते, गटारी, समाजमंदिरे, पाणीपुरवठा योजना आणि इतर मूलभूत सुविधा थांबल्या आहेत.

### थेट परिणाम गावांच्या विकासावर

विकासकामे ठप्प पडल्याने याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांवर होत आहे. अनेक गावांमध्ये सिमेंट रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. गटारींची कामे सुरू न झाल्याने स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. समाजमंदिरांसारख्या सार्वजनिक सुविधांची कामेही रखडली आहेत. ग्रामीण भागातील विकासाची गती पूर्णपणे मंदावली आहे.




जिल्हा नियोजन समिती, आमदार निधी, पंधरावा वित्त आयोग तसेच २५-१५ आणि ५४-१५ योजनांमधून सोलापूर जिल्ह्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर झाला आहे. निधीतून गावांमध्ये विकासकामांना मंजुरीही दिली होती. मात्र प्रशासकांना आर्थिक अधिकारच नसल्याने कामे प्रत्यक्षात सुरू होऊ शकलेली नाहीत. कामे पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदारांना पैसे कोण देणार, मंजुरी कोण देणार आणि अंतिम स्वाक्षरी कोणाची असणार, याबाबत स्पष्टता नसल्याने प्रशासनातही संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेतील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक व कंत्राटदारांना नवीन कामे सुरू करू नयेत, अशा तोंडी सूचना दिल्याची माहिती पुढे आली आहे.

## अमृतवचन : जैन मुनी धवलसागर व विशालसागर

### संस्कारातूनच घडेल आदर्श पिढी





केवळ भौतिक प्रगती म्हणजे जीवन नव्हे, तर भगवानभक्ती, सदाचार आणि अंतर्मनातील सकारात्मक परिवर्तन हाच खऱ्या प्रगतीचा मार्ग आहे, असे प्रेरणादायी प्रतिपादन परमपूज्य १०८ श्री धवलसागर आणि श्री विशालसागरजी महाराज यांनी केले. स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून डब्ल्यू.आय.टी. दिगंबर जैन टेम्पल येथे आयोजित 'जिन संस्कार शिबिरात' ते मार्गदर्शन करत होते. सात मुनींच्या मंगल सान्निध्यात सुरू असलेल्या या शिबिरात बालक आणि युवकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभत असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळत आहे.

मुनिश्रींनी यावेळी जीवनातील नैतिक मूल्यांवर प्रकाश टाकला. दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव होणे हीच खरी संवेदनशीलता आहे, असा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना दया, संयम आणि नियमपालनाचे महत्त्व पटवून दिले. माता-पिता की सेवा करने वाला स्वर्ग जाता है असे सांगत त्यांनी पालकांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. तसेच क्रोध, अहंकार, लोभ आणि कपट यांसारख्या विकारांचा त्याग करून दान, परोपकार व सत्कर्माचा मार्ग स्वीकारण्याचे मार्गदर्शन केले. रात्री भोजन त्याग आणि शिस्तबध्द जीवनशैलीमुळेच जीवन पवित्र होते, यावर त्यांनी भर दिला. सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी भक्तिभावाने भगवानांचा अभिषेक केला. यावेळी धवलसागर महाराजांनी 'गंधोदकाचे' महत्त्व विशद केले. अभिषेकानंतरचे हे पवित्र जल मस्तकावर धारण केल्याने सात्त्विकतेची वृद्धी होते आणि नियमित साधनेमुळे सामान्य श्रावकही उच्च आध्यात्मिक स्तर गाठू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विशालसागरजी महाराजांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत 'देव, शास्त्र आणि गुरु' या त्रिसूत्रीची ओळख करून दिली. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये धार्मिकता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ होत आहे.

## खाजाभाई बागवान यांच्या ग्रंथास प्रा. रसूल सोलापुरे संस्थेचा पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**
प्रा. रसूल सोलापुरे संस्था महाराष्ट्र तर्फे देण्यात येणारा प्रा. रसूल सोलापुरे संस्थेचे साहित्य पुरस्कार २०२६ ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेचे उपाध्यक्ष खाजाभाई बशीर बागवान यांच्या समीक्षण ग्रंथाला जाहीर झाला आहे. त्यांच्या सांस्कृतिक सावल्या.. मागोवा मुस्लिम मराठी स्त्री साहित्याचा या पुस्तकाला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळणार आहे. संस्थेच्या अध्यक्ष प्रा. रसूल सोलापुरे यांनी ही माहिती दिली.खाजाभाई बशीर बागवान यांच्या कार्याचे विविध स्तरातून कौतुक होत आहे. अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदेचे सचिव अय्युब नल्लामंदू, उपाध्यक्ष प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी, ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेचे संस्थापक शफी बोल्डेकर तसेच सहसचिव अनिसासिकंदर यांनी त्यांचे अभिनंदन केले.



सांस्कृतिक सावल्या या ग्रंथात मुस्लिम मराठी स्त्री साहित्याचा मागोवा घेतला असून, त्यातून सामाजिक-सांस्कृतिक संदर्भांची सखोल चिकित्सा केली आहे. या अभ्यासामुळे मराठी साहित्य क्षेत्रात नवा दृष्टिकोन निर्माण झाला आहे. सांस्कृतिक सावल्यास जाहीर झालेला हा तिसरा पुरस्कार आहे.

## अंगणवाडी मदतनीसांची सेवा ज्येष्ठता यादी जाहीर

### हरकतींसाठी मुदत फक्त २८ एप्रिलपर्यंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**
सोलापूर : बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), सोलापूर शहर पश्चिम कार्यालयामार्फत अंगणवाडी मदतनीसांची सन २०२६-२७ या वर्षासाठी प्राथमिक सेवा ज्येष्ठता यादी जाहीर करण्यात आली आहे. संबंधित मदतनीसांच्या सेविका पदावरील थेट नियुक्तीसाठी प्राप्त कागदपत्रांच्या आधारे ही यादी तयार करण्यात आली असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

या यादीतील नाव, नियुक्ती दिनांक, जन्मतारीख, शैक्षणिक पात्रता तसेच इतर तपशील संबंधितांनी काळजीपूर्वक तपासून पाहावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. यादीत काही त्रुटी, बदल किंवा हरकत असल्यास संबंधितांनी दि. २८ एप्रिल २०२६ पर्यंत लेखी स्वरूपात कार्यालयात हरकत नोंदवावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने स्पष्ट केले की, दि. २९ एप्रिल २०२६ रोजी अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे अंतिम मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही तक्रारी, हरकती किंवा अर्जांचा विचार केला जाणार नाही. ही सेवा ज्येष्ठता यादी भविष्यातील पदोन्नती, सेविका पदासाठीची निवड प्रक्रिया तसेच इतर प्रशासकीय कामकाजासाठी महत्त्वपूर्ण मानली जाते. त्यामुळे सर्व अंगणवाडी मदतनीसांनी विहित वेळेत कार्यालयीन पत्ता डॉ. आंबेडकर हौसिंग सोसायटी, गडहिरे बिल्डिंग, उजनी कॉलनी, अंत्रोळीकर नगरजवळ, आर्किटेक्चर कॉलेज मागे, सिव्हील लाईन, सोलापूर येथे यादी तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन केले आहे. संबंधित अंगणवाडी मदतनीसांनी मुदत लक्षात घेऊन तातडीने यादी तपासावी आणि आवश्यक असल्यास हरकत नोंदवावी.

## पालिकेतील सरळ सेवा भरती रद्द करून बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना न्याय द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ एप्रिल-**
सोलापूर महापालिकेतील नियोजित १३७ सेवकांची सरळ सेवा भरती रद्द करून त्याऐवजी २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने निवेदन पालकमंत्री जयकुमार गोरे यांना देण्यात आले.

सोलापूर महापालिकेतील २४९ बदली रोजंदारी कर्मचारी गेल्या २५ ते ३० वर्षापासून प्रामाणिकपणे कार्यरत असून ते आजतागायत सेवेत कायम झाले नाहीत याबाबतचा प्रस्ताव नगर विकास खाते मंत्रालय महाराष्ट्र शासन (मुंबई) येथे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. महापालिकेतील ४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सोमपा मधील १३७ रिक्त पदावर भरती करावी. यामुळे २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना या रिक्त पदी भरती केल्यास महापालिकेच्या आर्थिक तिजोरीत जास्त भार पडणार नाही. यासंदर्भात आ.देवेंद्र कोठे यांनी विधानसभेमध्ये आवाज उठवला आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या पदाधिकाऱ्यांची नगर विकास खाते मंत्रालय (मुंबई) यांच्या समवेत बैठक आयोजित करुन न्याय मिळवून द्यावा, असेही म्हटले आहे. दरम्यान, या प्रश्नाबाबत बोलताना आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंडयाल यांनी लवकरात लवकर बैठक घेण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी अध्यक्ष कामगार नेते बापूसाहेब सदाफुले, मार्गदर्शक इक्बाल तडकल, कार्याध्यक्ष योहान कानेपागुलू उपस्थित होते.

## शावळ येथे जयंतीची वर्गणी न दिल्याने तरुणास बेदम मारहाण

**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**
जयंतीची वर्गणी न दिल्याच्या कारणावरून एका तरुणाला पाच जणांनी मिळून लाथा बुक्क्याने मारहाण केल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील शावळ गावात शनिवारी रात्री घडली.बाबुराव दत्तात्रय शिवशरण (वय ३० वर्ष, रा . शावळ ) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून २५ एप्रिल रोजी रात्री साडेनऊ वाजता तो गावातील बाजार कट्टा येथे असताना जयंतीची वर्गणी देत नसल्यामुळे त्याला नितीन शिवशरण, लक्ष्मण शिवशरण, महेश शिवशरण, अनिल शिवशरण आणि सचिन शिवशरण यांनी मिळवून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली . यात सर्व अंगाला मार लागल्याने त्याला अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात काका सदाशिव शिवशरण यांनी रविवारी रात्री दाखल केले .

## शिष्यवृत्ती रक्कम समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**
इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये अक्कलकोट तालुक्यात सर्व माध्यमातून प्रथम क्रमांक तसेच जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत अव्वल स्थान मिळवणारी विबोधी यादव ही विद्यार्थिनी आपल्या उल्लेखनीय यशामुळे सर्वांच्या कौतुकाचे धनी ठरली आहे.

विबोधीला मिळालेली शिष्यवृत्ती रक्कम स्वत:साठी न वापरता तिने आपले आजोबा समाजसेवक शिक्षण प्रेमी स्व. बाळासाहेब हांडे यांचा कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजोपयोगी कार्यासाठी खर्च करण्याचा प्रेरणादायी निर्णय घेतला. त्यांचा विचाराचा वारसा पुढे नेत विबोधीने शिक्षणाच्या क्षेत्रात योगदान देण्याचा संकल्प या भावनेतून तिने शिक्षणाच्या उन्नतीसाठी ती शिकत असलेली शाळा मातोश्री लक्ष्मीबाई सातलिंगप्पा म्हेत्रे प्रशाला दुधनी व जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा शिवाजीनगर तांडा दुधनी येथील माजी मुख्याध्यापक पोमू राठोड या दोन शाळांना संपूर्ण शिष्यवृत्ती रक्कम प्रदान केली.

## बालरंगभूमी परिषदेच्या उन्हाळी शिबिराचा समारोप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**
बालरंगभूमी परिषद, शाखा सोलापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय उन्हाळी व्यक्तिमत्व विकास शिबिराचा समारोप झाला. २३ ते २६ एप्रिल या कालावधीत पार पडलेल्या या शिबिराला विद्यार्थी आणि पालकांनी उदंड प्रतिसाद दिला.

शिबिराची सुरुवात दररोज सकाळी अन्नपूर्णा साखरे, अर्चना अडसूळ आणि शोभा गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली होत होती. यामध्ये ध्यान, प्राणायाम, शारीरिक व्यायाम आणि स्तोत्र पठण यांवर भर देण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होण्यास मदत झाली.

प्रसिद्ध गायक व संगीत तज्ज्ञ प्रशांत देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना स्वर, ताल आणि लयीचे धडे दिले. मुलांकडून बालगीते व कविता गाऊन घेत त्यांनी संगीताची गोडी निर्माण केली. यावेळी बोलताना ते म्हणाले, मधमाशी जशी फुलाफुलांतून थोडा थोडा मध गोळा करते, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी जिथे जिथे ज्ञान मिळेल, तिथून ते आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रसिद्ध कलाकार भैरप्पा कारभारी यांनी 'टाकाऊपासून टिकाऊ' वस्तू बनवण्याचे कौशल्य शिकवले, तर नृत्य प्रशिक्षिका तेजश्री श्रीरेखम यांनी विद्यार्थ्यांना नृत्याच्या विविध हालचालींचे प्रशिक्षण दिले.

'वाईल्ड लाईफ कन्झर्वेशन असोसिएशन'च्या वतीने पक्ष्यांसाठी घरटी बनवण्याची विशेष कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये असोसिएशनचे अध्यक्ष अजित चव्हाण, सिद्धांत चव्हाण आणि सुरज धाकपाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वहस्ते घरटी बनवून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला. समारोप कार्यक्रमास बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार, कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह अर्चना अडसूळ, सहकार्यवाह संजय सावंत तसेच नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह ज्योतिबा काटे उपस्थित होते. यावेळी बालरंग भूमीचे कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांना मिळालेल्या विशेष पुरस्काराबद्दल बालरंगभूमी परिषदेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शिबिरातील प्रशिक्षक प्रशांत देशपांडे, अन्नपूर्णा साखरे आणि शोभा गिराम यांचाही सत्कार करण्यात आला.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी मुकुंद शेटे, मच्छिंद्र सफताळे, गणेश कोळी, खंडू शिंदे आणि दिक्षित यांनी परिश्रम घेतले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना दररोज खाऊ आणि सरबत वाटप करण्यात आले.



## महात्मा बसवेश्वरांच्या समतावादी विचारांची आजही आवश्यकता : प्रा. बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**
महात्मा बसवेश्वरांनी कर्मप्रधान, नैतिक व समताधिष्ठित जीवनशैलीचा पुरस्कार करत समाजातील विषमता दूर करण्यासाठी दिलेले तत्त्वज्ञान आजच्या काळातही तितकेच मार्गदर्शक ठरते, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले.

महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील बसवेश्वर अध्यासन केंद्राच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रा. बिराजदार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा होते. यावेळी प्र-कुलसचिव डॉ. अतुल लकडे, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीकांत अंधारे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, अध्यासन केंद्राचे राहुल पावले, प्राचार्य गजानन धरणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी बसवेश्वर अध्यासन केंद्राचे प्र. संचालक डॉ. चंद्रकांत गार्डी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. रेवा कुलकर्णी यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मंदिर जतन व संवर्धन आराखड्यातील सुरु असलेली कामे १७ मे पर्यंत पूर्ण करा

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन; भक्तनिवास येथे बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ एप्रिल-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी अधिकमासात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्यासुविधेसाठी मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत बाजीराव पडसाळी येथील सुरूअसलेली कामे येत्या १७ मेपर्यंत गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करावीत, अशा सूचनाजिल्हाधिकारी एस. कार्तिकीयेन यांनी दिल्या.

श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा बाबत भक्तनिवास येथे बैठक घेण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, बाजीराव पडसाळी येथील कव्हर शेडचे काम सुरू असल्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन येणाऱ्या वयोवृद्ध भाविकांना रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी जाताना अडचणी येतात. अधिक मासात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता कव्हर शेडचे काम



तात्काळ पूर्ण करावे. तसेच महालक्ष्मी व बालाजी मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यासाठी व्यंकटेश्वर मंदिर व महालक्ष्मी मंदिराचे काम तात्काळ पूर्ण करावे अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी मंदिरसमितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी मंदिर समितीकडून आवश्यक ते सहकार्य मिळेल. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची होणारी गैरसोय लक्षात घेता संबंधित कंत्राटदाराने तात्काळ कामे पूर्ण करावीत असे सांगितले. बैठकी नंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकीयेन यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन संबधीतांना आवश्यक सुचना दिल्या. बैठकीस मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, नगराध्यक्षा तथापदसिद्ध सदस्या प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिनइथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजीशिंदे, ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, प्रकाशमहाराज जवंजाळ, शिवाजीराव मोरे,जिल्हानियोजन अधिकारी दिलीप पवार,उपकार्यकारी अभियंता भीमाशंकर मिटकरी, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश रोकडे तसेच ऑनलाइनद्वारे पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहणे व वास्तु विशारद तेजस्विनी आफळे उपस्थित होते.

### कामांबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकीयेन म्हणाले, मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत बाजीरावपडसाळी येथील व्यंकटेश्वर मंदिर, महालक्ष्मी मंदिर, कव्हर शेड आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत. यासाठी संबंधित कंत्राटदाराने काम ाची गतीवाढविण्यासाठी अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करावे. पुरातत्त्व विभाग व संबंधितकंत्राटदार यांनी मंदिर समितीचे सदस्य यांच्या समवेत सुरू असलेल्या कामांची पाहणीकरून अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करावीत. मंदिरातकोठेही पाण्याची गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी. दगडी कोटिंग कामे पुर्णकरावीत तसेच प्रांताधिकारी व मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी यांनीसुरु असलेल्या कामांचा दररोज आढावा घ्यावा. महालक्ष्मीमंदिर येथे भिंतींना ओलावा धरत असल्याने त्याची पाहणी करून तात्काळ उपाययोजनाकराव्यात त्याचबरोबर पश्चिमद्वारचे काम तात्काळ सुरू करावे अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी यावेळी दिल्या.

---

## महत्वाचे...



### माढा काँग्रेस कमिटीकडून बागेश्वर बाबाचा निषेध

**माढा, दि. २७ एप्रिल-**

छत्रपती शिवाजी महाराजांन विषयी अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल बागेश्वर बाबाचा माढा तालुका काँग्रेस कमिटीने निषेध व्यक्त करून सोमवार दिनांक २७ एप्रिल रोजी माढा तहसीलदार संजय भोसले यांना निवेदन देऊन शासनाने संबंधित बाबावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून त्यांच्या बद्दल कोणत्याही प्रकारचा अपमान सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. संबंधित व्यक्तीविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी तसेच महाराष्ट्रात प्रवेशबंदी घालण्याची मागणीही करण्यात आली. याप्रसंगी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय पाटील, जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस जहीर मणेर, कुर्डुवाडी ब्लॉक शहर काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष फिरोज खान, तालुका उपाध्यक्ष संपत काळे, कुर्डुवाडी शहर काँग्रेस कमिटी अल्पसंख्याकचे अध्यक्ष हमीद शिकलकर, तालुका अध्यक्ष अल्पसंख्याक जमीर काझी, माढा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पृथ्वीराज साठे, कुर्डुवाडी शहर काँग्रेस कमिटीचे सचिव निलेश गवळी, ज्ञानदेव सुतार उपस्थित होते.



### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थी लवकरच रोजगाराभिमुख होईल : डॉ. शिंदे

**अक्कलकोट, दि. २७ एप्रिल-**

राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षणाची द्वारे खुली झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यापक संशोधन कार्यास प्रोत्साहन मिळाले आहे त्यामुळे विद्यार्थी लवकरच रोजगाराभिमुख झालेला दिसेल असा विश्वास वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ. शिवाजीराव शिंदे यांनी व्यक्त केले. मातोश्री गुरु बसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर व्याख्यान देताना ते बोलत होते अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याण शेट्टी होते यावेळी डॉ एस वाय जाधव डॉ सुनील पाटील डॉ ए जी माळगे प्रा ए ए वरडोळे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले आभार प्रा मधुबाला लोणारी यांनी मानले. कुलगुरू डॉ प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी अत्यंत काटेकोरपणे केली आहे ही कौतुकास्पद कामगिरी असून लवकरच या धोरणाचे परिणाम दिसून लागतील, असे अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव शिंदे यांनी सांगितले.



### शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध; निमगाव येथे शेतकऱ्यांची बैठक

**पिलीव, दि. २७ एप्रिल -**

माळशिरस तालुक्यातुन जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गला विरोध करण्यासाठी आंदोलनाची दिशा ठरविण्याबाबत निमगाव येथे शेतकऱ्यांची बैठक आयोजित केली होती. माळशिरस तालुक्यातून नेवरे ते गारवाड हा शक्तीपीठ महामार्ग संपूर्ण बागायत पट्यातून जात असून जे बाधीत शेतकरी आहेत. त्यांचे प्रपंच उध्वस्त होणार आहेत, अशा जुल्मी शक्तीपीठला ताकदीनीशी विरोध तालुक्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांनी करण्याचे सर्वानुमते ठरले शक्तीपीठ हा ज्यांच्या शेतातून जात आहे त्यांना अनेक दलांनी भुरळ पाडुन टक्केवारीचे आमीष दाखवून उभी पिके जमीनदोस्त करून करार पध्दतीने आंबा लागवड करण्यास भाग पाडले तर ही योजना फसवी असून शेतकऱ्यांना या पासून फायदा कसलाच मिळणार नाही. नुकसानच होणार आहे, तरी बाधीत शेतकऱ्यांनी अशा फसव्या योजनांना बळी पडू नये, असे आवाहन सभापती दत्ता मगर यांनी केले. यावेळी के. के. पाटील, हनुमंत पवार, संभाजीराव मगर यांनी शेतकऱ्यांना एकजुटी अंदोलन करण्याचे आवाहन केले. ॲड. लक्ष्मण मगर, महादेव मगर, उत्तम पाटील, भारत मगर, उत्तम शेळके, दत्तात्रय मगर, विष्णुपंत मगर, महावीर मगर, सौरभ मगर उपस्थित होते. आभार रामभाऊ मगर यांनी मानले.

### भाजप मोहोळ, दक्षिण तालुका अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्षपदी आनंद कुचेकर

**मोहोळ, दि. २७ एप्रिल -**



स. वरवडे (ता.मोहोळ)येथील आनंद हनुमंत कुचेकर यांची भाजप मोहोळ-दक्षिण तालुका अनुसूचित जाती मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. निवडीचे लेखी पत्र महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. विश्वजीत गायकवाड (नागपूर) यांनी दिले आहे. कुचेकर हे २९ वर्षापासून भाजपचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांनी विद्यार्थी संघटनेचेही काम केले आहे. पर्यावरण संतुलनासाठी अनावश्यक खर्चाला फाटा देऊन वृक्षारोपण, ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध दाखले उताऱ्यासाठीच्या शिबिराचे आयोजन केले होते. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत त्यांनी मतदान केंद्रप्रमुख म्हणून चांगली कामगिरी केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

---



## 'स्वेरी'त एमएचटी-सीईटी परीक्षा सुरु

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. २७ एप्रिल-**

येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये एमएचटी-सीईटी २०२६ ही परीक्षा सुरळीतपणे सुरु असल्याचे चित्र दिसून येत आहे. या परीक्षेचे व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी संगणकांवर आधारित विविध तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षित आणि पारदर्शक परीक्षा प्रणाली राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे विविध अभ्यास क्रमांसाठी आवश्यक असलेली एमएचटी-सीईटी ही परीक्षा राज्यभरघेतली जात असून स्वेरीमध्ये दि. २५ मार्च २०२६ पासून ही परीक्षा सुरु झाली असून तीशासनाच्या संकेतस्थळावर दिलेल्या तारखांनुसार दि. १७ मे २०२६ पर्यंत चालणार आहे.यामध्ये तीन वर्ष व पाच वर्षांसाठी असलेले विधी अभ्यासक्रम (लॉ), इंजिनिअरिंग (पीसीएम), फार्मसी (पीसीबी), मास्टर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन्स(एमसीए) व बॅचलर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशंन्स (बीसीए) या अभ्यासक्रमांसाठी आवश्यकअसलेल्या एमएचटी-सीईटी येथे होत आहेत. कांही अभ्यासक्रमांसाठी सीईटी परीक्षा पूर्ण झाल्या आहेत तर कांही अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्याप सूरु आहेत.

परीक्षेमध्ये बॉयलर प्लेट भाषा- पर्याय १ मधून महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सीईटी २०२६ साठी तंत्रज्ञान-आधारित उपाययोजनांचा व्यापक संच अंमलात आणला असूनपरीक्षा प्रक्रियेची प्रामाणिकता, पारदर्शकताआणि कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. ऑनलाईनच्या माध्यमातून आधार कार्ड, अपार कार्ड यांची पडताळणी, चेहरा ओळख (फेशियल रिकग्निशन) आणिबायोमेट्रिक प्रमाणीकरण यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानामुळे प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांची मजबूत पडताळणी सुनिश्चित केली जात आहे.

## भिमप्रकाश संस्थेतर्फे महापुरुषांची संयुक्त जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ एप्रिल-**

भिमप्रकाश मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था अक्कलकोटच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक एस टी स्टँड येथे महात्मा बसवेश्वर महात्मा जोतिबा फुले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून आलेल्या सर्व भिमसैनिक व नागरिकांना जेवण वाटपाचा कार्यक्रम करून समारोप करण्यात आला. सदरचा कार्यक्रम दि. २१ एप्रिल रोजी घेण्यात आला.



याप्रसंगी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विजय हर्डीकर, नगरसेवक अविनाश मडिखांबे ज्येष्ठ नेते शिवराज बिराजदार, युवानेते जोतिर्लिंग स्वामी, माजी सरपंच प्रकाश दुपारगुडे, माजी सरपंच रमेश बनसोडे, शिवबसव डॉ. बी. आर. आंबेडकर मागासवर्गीय संस्थेचे अध्यक्ष संदिप मडिखांबे, पत्रकार स्वामीराव गायकवाड, पत्रकार राजेश जगताप, कामगार नेते सिद्धार्थ बनसोडे, युवा नेते संदिप बाळशंकर, परशुराम भगळे, प्रशांत मडिखांबे, ओंकार कांबळे, शरणू किणीकर, देविदास नडगम, नितेश मडिखांबे, अजय मडिखांबे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिलामणी बनसोडे, खजिनदार विजय भालेराव संस्थापक सहसचिव प्रदिप मडिखांबे, उपाध्यक्ष शिवा मडिखांबे, सदस्य पुष्पराज मडिखांबे, उत्सव अध्यक्ष शिवा नाटीकर, उपाध्यक्ष राम सोनकांबळे, खजिनदार रतन इंगळे, सचिव पोपट बनसोडे, गंगाराम वाघमारे, अजय इसामंत्री, किशोर शिंदे, नागेश गायकवाड, जय बनसोडे, संदेश साबळे, पृथ्वीराज चौधरी, रवि मुगळे यांनी परिश्रम घेतले.

## अर्थरक्षकाबरोबरच आता जीवनरक्षकही

### पंढरपूर अर्बन बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी रोटरी क्लब ऑफ पंढरपूरचा विशेष उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ एप्रिल -**

अर्थ कारणाबरोबर समाजकारणात अग्रेसर असणारी पंढरपूर अर्बन बँक कर्मचारी वर्गाला रोटरी क्लब ऑफ पंढरपूर यांचे वतीने आज बँकेचे कर्मयोगी सभागृह येथे आरोग्य जनजागृती उपक्रमांतर्गत सीपीआर (उरीवळेींश्रोपरीू ठशीीलळींरींळेप) या जीवनरक्षक तंत्रावरील मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रम पार पडला.



यावेळी डॉ.नीरज दोडके व डॉ.वैभव सादिगले, तसेच बँकेच्या संचालिका डॉ.संगीता पाटील यांनी हृद्यविकारासारख्या आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला त्वरित मदत कशी करावी याबाबत सखोल माहिती दिली. यावेळी बँकेचे संचालक हरिश ताठे, अमित मंगले, गणेश शिंगण, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, व्यवस्थापक गणेश हरिदास व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बँकेचे कुटुंबप्रमुख प्रशांत परिचारक व चेअरमन सतीश मुळे यांनी रोटरी क्लब ऑफ पंढरपुरची या स्तुत्य उपक्रमा बद्दल प्रशंसा केली.

कार्यक्रमा दरम्यान कृत्रिम श्वास कसा द्यावा, तसेच हृदयावर किती प्रमाणात व कशा पद्धतीने दाब (लहशींीलेाीर्शीीळेपी) द्यावयाचे याबाबत सांगितले. अपघात किंवा अचानक बेशुद्ध पडलेल्या रुग्णामध्ये सीपीआर आवश्यक आहे की नाही हे कसे ओळखावे आदींबाबतही मार्गदर्शन केले. कार्यक्रमानिमित्त बँकेच्या संचालकांनी डॉक्टरांचे आभार मानले.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे आणि कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांनाही डॉ. दोडके यांनी उत्तरे दिली.

बँकेचे कर्मचारी भविष्यात अर्थरक्षकाबरोबर जीवनरक्षक म्हणून कार्य करतील, अशी अपेक्षा रोटरी क्लबच्या वतीने व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास बँकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अठरा वर्ष पूर्ण असणाऱ्यांची मतदार नाव नोंदणीच होत नाही

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि २७ एप्रिल -**

वय अठरा वर्ष पुर्ण असलेल्यांचे नाव नियमानुसार मतदार यादीत घालता येते. पण सध्या मतदार यादीत ज्याचे वय अठरा वर्ष पुर्ण आहे किंवा एकोणीस वर्ष सुरु आहे अशांची ऑनलाईन नावे मतदार यादीत घेतच नाहीत. यामुळे अधिकार असुन किंवा वय पुर्ण असताना ऑनलाईन सिस्टीमला नाव नोंदणीच होत नसल्याचे दिसून येत आहे.

बिएलओंनाही यात काहीच करता येत नाही. माळशिरस येथील निवडणूक विभागाकडे वारंवार तक्रार करुनही दखल घेतली नाही. वरुनच बिघाड असल्याचे बोलले जात आहे. ज्यांची वय २० वर्ष पुर्ण आहेत त्यांचीच नावे घेतआहेत. परिणामी अठरा वर्ष पुर्ण असणाऱ्यांचा दोन वर्ष मतदानाचा हक्क हिरावून घेतलयासारखेच आहे. याबाबत बिएलओ सचिन गाटे यांनी माजी आमदार राम सातपुते यांच्याकडे कैफियत मांडली. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत सांगितले असता त्यांनी हा प्रश्न ताबडतोब मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

# सोलापूर जिल्हा गणित मंडळाचे कार्य कौतुकास्पद

### माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ एप्रिल-**

जिल्हा गणित मंडळ व त्यांचे सर्व पदाधिकारी विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची गोडी निर्माण करत आहेत. गणितातील प्रज्ञावंत विद्यार्थी शोधायचेही काम करीत आहेत. गणित मंडळाचे हे कार्य कौतुकास्पद आहे असल्याचे पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळ संलग्न सोलापूर जिल्हा गणित अध्यापक मंडळ व सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग माध्यमिक यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी सोलापूर येथील सुशील रसिक सभागृह येथे एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. यावेळी सावंत बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन माजी आमदार दत्तात्रय सावंत व पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली समाज अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या उपस्थितीत थोर गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचे प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले .

यावेळी गणित प्रश्नमंजुषा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी व आदर्श गणित परीक्षा विभाग प्रमुख यांचा उपस्थितांच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र व बुके देवून सन्मान करण्यात आला. गणित अध्यापनात जिओजेब्राचा वापर यावर प्रकाश कांबळे यांचे व्याख्यान झाले. दीपक शेटे यांनी गणित प्रयोगशाळा कशी असावी याची मॉडेल्स दाखवली. दुपारच्या सत्रात महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने, सोलापूर शहराचे प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने, जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे विज्ञान निरीक्षक अनिल बनसोडे यांच्या उपस्थितीत जीवन गौरव पुरस्कार व आदर्श गणित शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. ार्यशाळेसाठी जिल्हा गणित मंडळाचे अध्यक्ष संजय भस्मे, सचिव प्रीतम माशाळ, सोलापूर शहर मंडळाचे अध्यक्ष समीर कुलकर्णी, जिल्हा मंडळाचे कार्याध्यक्ष शिवाजी चौगुले, माजी जिल्हाध्यक्ष सुर्यकांत चोरमले, नीलकंठ लिंगे, महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळाचे माजी उपाध्यक्ष रमेश आदलिंगे व महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळाचे प्रकाशन समिती प्रमुख शिवशरण बिराजदार, जिल्हा सदस्य व तालुका पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन वंजारी यांनी तर प्रितम माशाळ यांनी आभार मानले.

**जीवन गौरव पुरस्कार -**

श्री सिकंदर नदाफ, निवृत्त प्राचार्य, जीवन विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भंडारकवठे दक्षिण सोलापूर

**आदर्श गणित शिक्षक पुरस्कार**

- विक्रम टकले मुख्याध्यापक - बार्शी टेक्निकल हायस्कूल, बार्शी
- मंगेश सोनवणे- शिवछत्रपती विद्यालय बाभुळगाव ता. बार्शी
- अमोल शिंदे -सावित्रीबाई फुले विद्यालय, माळशिरस
- बाळासाहेब काशिद - सदाशिवराव माने विद्यालय अकलुज
- महादेव जुंदळे-विद्यामंदिर हायस्कूल लक्ष्मी दहिवडी ता. मंगळवेढा
- संजय शिरसट - नूतन विद्यालय कुर्डुवाडी
- अविनाश रसाळ- महात्मा गांधी विद्यालय, करमाळा
- देवानंद चव्हाण- संगमेश्वर विद्यालय संगोबा ता. करमाळा
- गुरुनाथ माने- राजश्री राजन पाटील माध्यमिक व उच माध्य विद्यालय पेनूर ता.मोहोळ
- आनंद खंडागळे - चिंचोली विद्यालय, चिंचोली
- दिनेश सुरवसे - ज्ञानदीप विद्यालय, सांगोला
- विनायक पाटील - नाझरा विद्यामंदिर, नाझरा ता. सांगोला
- सीमा फडतरे - वसंतराव काळे प्रशाला वाडीकुरोली ता. पंढरपूर
- वेदवती गवई - मेहता माध्यमिक शाळा, जुळे सोलापूर
- संगिता अडकी - निलकंठेश्वर प्रशाला, सोलापूर
- रमेश सिडगिद्दी - लक्षण महाराज प्रशाला, सोलापूर
- गौतम कांबळे - हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर
- कस्तुरचंद आळंद - श्री शिवचलेश्वर हायस्कूल मैंदर्गी ता. अक्कलकोट
- धनश्री देगांवकर - इंडियन मॉडेल स्कूल, अक्कलकोट
- सिद्धाराम तुकशेट्टी - सोनटक्के प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय तांदूळवाडी ता. दक्षिण सोलापूर

**आदर्शपरीक्षा विभागप्रमुख**

- सूर्यकांत चोरमले - सुलाखे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बार्शी, ता. बार्शी
- शिवानंद पुजारी ता. अक्कलकोट
- अण्णासाहेब गायकवाड ता. सांगोला
- आनंद केसकर, सोलापूर शहर

